या ग्रंथास

दक्षिणा प्रैज कमेटींनें बक्षीस दिलें आहे.

# श्रीमंत नारायण राव पेशवे

## यांचा वध.

हें लहानसें काव्य

## गोविंद वासुदेव कानिटकर, बी. ए.

यांनीं रचिलें

तें

सखाराम परशुराम पंडित

यांनीं

मुंबईंत

"इंदुप्रकाश" छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें.

सन १८७८

शके १८००.

( हा ग्रंथ १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें नोंदला आहे. )

किंमत ८ आणे.

# THE MURDER OF NARAYAN RAV PESHWA

## A MARATHI PRIZE POEM

PRESENTED TO

**THE DAKSHINA PRIZE COMMITTEE**

BY

GOVIND WASUDEV KANITKAR B.A.

AND

PRINTED AND PUBLISHED

BY

SAKHARAM PARASHURAM PANDIT

AT THE

"INDU-PRAKASH" PRESS.

Bombay:

1878

*(Registered under Act XXV. of 1867.)*

*Price 8 Annas.*

या ग्रंथास

दक्षिणा प्रैज कमेटीनें बक्षीस दिलें आहे.

# श्रीमंत नारायण राव पेशवे

## यांचा वध.

हें लहानसें काव्य

## गोविंद वासुदेव कानिटकर, बी. ए.

यांनीं रचिलें

तें

सखाराम परशुराम पंडित

यांनीं

मुंबईंत

"इंदुप्रकाश" छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें.

---

सन १८७८.

---

शके १८००.

---

( हा ग्रंथ १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें नोंदला आहे. )

किंमत ८ आणे.

DEDICATED

TO

HIS MUCH-ESTEEMED AND BELOVED

FATHER

RAV. BAHADUR WASUDEV BAPUJEE KANITKAR

Executive Engeneer P. W. Department

AND

FELLOW OF THE UNIVERSITY OF BOMBAY

AS A

humble tribute of filial love and affection

by

his dutiful son

*THE AUTHOR.*

रावबहादूर वासुदेव बापूजी
कानिटकर

एक्झिक्युटिव एंजिनीयर;

फेलो आफ् दि बाँबे यूनिव्हरसिटी

यांचे सेवेशीं

हें लहानसें काव्य

ग्रंथकर्त्यानें पितृभक्तीस उद्देशून नम्रतापूर्वक
व कृतज्ञतापूर्वक परमादरानें अर्पण
केलें असे.

# प्रस्तावना.

---

या संसाररूप रंगभूमीवर मानवाचे मनोविकार हींच कोणी पात्रें बनून आज अनंतकालपर्यंत नर्तन करीत आहेत. काम, क्रोध, मत्सर इत्यादि चित्तवृत्तींस आपण षड्रिपु म्हणत आलों; परंतु अल्पविवेक केला असतां असें दिसतें कीं, या प्रपंचरूप नाटकाचा जो सूत्रधार त्या सृष्टिविनायकानें हे विकार आपलीं बाहुलीं नाचविण्याचीं कळसूत्रेंच कल्पिलीं आहेत.

वाचक हो! पुणें मुक्कामीं शनिवारचा वाडा आपणांपैकीं बहुतेकांनीं प्रत्यक्ष पाहिला असेल. कितीएकांस ऐकून तरी ठाऊक असेल. या वाड्यांत सुमारें शंभर वर्षांपूर्वी एका दुष्ट प्रसंगीं व दुर्दिनीं मत्सरानें अति भयंकर असा नाटकप्रयोग करून दाखविला व आपल्या त्या निंद्य कामगिरीबद्दल एक मोहोरा वळी घेतला, ही गोष्ट आपणां सर्वांस इतिहासावरून विदित आहेच.

वनांतील शोभेची क्षणभर कल्पना करावी. आकाश स्वच्छ असावें. ऐन मध्यान्हीचा काल असावा. चित्रविचित्र रंग भूमिपृष्ठावर दिसत असावे. वृक्षांची रमणीय हिरवी पालवी प्रेक्षकजनांच्या नेत्रांस थंडगार करण्यासारखी असावी. अशा समयास व अशा प्रसंगास चित्तवृत्ति किती उन्नत होवात? काय उल्हास! काय मौज

वाटते ! अशा अप्रातिम सुखाचा अनुभव आपण घेत असतां तों एकाएकीं वादळ सुटावें, प्रचण्ड निविड मेघांनीं आकाश व्याप्त करावें, सृष्टींतील पंचतत्वांनीं जणुं मदिराप्राशन करून किंवा निर्बंध होऊन बंड करूं लागावें, मेघांनीं गर्जना करावी, विद्युल्लतेनें खड्गाप्रमाणें अव्याहत चमकत राहावें, वारा क्रुद्ध होऊन सोसाट्यानें वाहूं लागावा. असा तडाका चालला असतां एकाएकीं सकलविश्वाचा प्रकाशक व सर्वांचा आनंददाता सूर्यनारायण अस्तास जातो. मग पृथ्वीतलावर घोर भयंकर असें तिमिरपटल विस्तीर्ण होऊन पूर्वींची सर्व शोभा सहसा नाहींशी होते. जी वनश्री एका क्षणापूर्वीं रमणीय वाटत होती ती आतां जाऊन मनाच्या ठायीं भीति व विस्मय असे दोन विकार उत्पन्न होतात. जिकडे तिकडे भयाण उदास भासूं लागतें.—वाचक हो! सांगण्याचें तात्पर्य इतकेंच कीं, तद्वत् त्या दुर्धर दुष्ट प्रसंगीं पुण्याचा वाली, पुण्याचा मोहोरा गेला. श्रीमंत पुण्यपत्तनाधिपति श्रीसूर्यनारायण अकस्मात मावळला. तारांगणांतून एकाएकीं अति तेजस्वी तारा अधोभागीं या भूपृष्ठावर कोसळला. सुमेरासिंगराहूनें त्या तेजोराशीस ग्रासून टाकिलें. त्या आणंदीच्या मत्सररूपप्रदीपांतील संतापानें तप्त झालेल्या स्वार्थरूप तैलांत पुण्याचा स्वामी पतंगवत् पडून नष्ट झाला! मग काय विचारावें? मराठी राज्यास उतरता पाया लागला. अल्प कालांतच राज्य गेलें, वैभव गेलें, सत्ता गेली, शोभा गेली, सर्व कांहीं गेलें. विप्रसत्तारूप चंद्राची वृद्धिंगत होणारी कला नष्ट झाली.

जनसमूहाच्या हृदयास आनंद देणारी चंद्रिका चंद्राबरोबर गेली. मासपूर्वार्ध जाऊन लवकरच काळोखाच्या रात्री आल्या. उत्तरोत्तर अमावास्या अधिक अधिक सन्निध येत चालली. इतका सगळा अनर्थ एक मत्सरानें केला.

बांधव हो! तर आतां या माझ्या लहानशा कवितेनें तुमचे परस्परांतील कलह, परस्परांविषयीं द्वेषबुद्धि व मत्सर इत्यादि अहितकारक विकार घालवून देऊन तुमच्या ठिकाणीं एकी उत्पन्न करावी अशी माझी नम्रतापूर्वक भगवंताजवळ प्रार्थना आहे.

प्रस्तुत पद्यरचनेंत खरें कवित्व किती असेल तें असो, त्याचे परीक्षक व रसग्राहक आपण आहां. मी आपल्याकडून मिष्ट म्हणून तयार केलेलें भोजन आपणास इष्ट झालें तर मी आपणांस फार फार कृतार्थ समजेन.

आतां आपला काळ विशेष न घेतां अगोदर इतका उल्लेख करवों कीं, प्रथमसर्गांत आपण साताऱ्याच्या किल्ल्यावर बसले अहां अशी कल्पना करा. नंतर आसमंतातच्या प्रदेशाची शोभा पाहा. ती पाहिल्यानंतर साताऱ्याच्या दरबारांत श्रीमंत नारायणराव पेशवे यांस वस्त्रें कशीं मिळालीं व त्यांस रामराजानें पुण्याचे नवे मालक कसे केले इत्यादि चमत्कार अवलोकन करा. दुसऱ्या सर्गांत कलहोत्पत्तीचें वर्णन वाचा. तिसऱ्यांत शनवार वाड्यांतील गणपतिमहालाची मौज व तेथील कल्पित चमत्कार पाहा. चौथ्यांत सुमेरसिंगाशीं परिचय करून तो दुष्ट प्रतिज्ञेच्या घोळांत कसा सांपडला

हें पाहा व पांचव्यांत तो सूर्यनारायण भयंकर मेघमंडलाच्या तडाक्यांत सांपडून एकाएकीं मावळल्यानंतर दुःखशोकांनीं व्याप्त होण्यास राजी व्हा. याप्रमाणें सामग्री मिळवून पदार्थ तयार करून आपणांपुढें वाट ठेविलें आहे. जें रुचिकर व स्वादिष्ठ वाटेल तें घेऊन अवशिष्ट वर्ज्य करावें, ही विनंती.

यद्रोचते तद्ग्राह्यं
यन्न रोचते तत् त्याज्यम् ॥
कारण
भिन्नरुचिर्हि लोकः ।

गो. वा. कानिटकर.

# OPINIONS.

---

This poem, styled by the author as "the death of Náráyan Rav Peishwá," contains 325 verses in different metre, generally used in metrical compositions and has for its motto a distich from the Fifth Act of Shakuntalá, which runs as follows 'स्त्रीणामशिक्षितपटुत्वममानुषीषु || संदृश्यते किमुत याः प्रतिबोधवत्यः ||

The motto is a beautiful selection, as it serves at once to show the character of the prominent personage in the poem.—Anandi Bái. The writer opens his poem with an address to the fort of Sattárá, where he supposes himself to be seated engrossed in reveries and holding communion with the bulwark of the Máráthá Empire. The poet in his revery imagines that he hears a beautiful piece of advice from the once honored fort—now lying forlorn. After this, the poet, as if come to his senses, sees nothing but dead quiet. He then proceeds to describe the fort—its strength, its magnitude, its picturesque environs, its gigantic ramparts, its stupendous gates, its beautiful and magnificient domes and palaces, its sweet water-reservoirs, its natural and artificial products, and ends the scene with a charming and sublime description of Shiváji and his political and spiritual tutor and adviser—the all-revered Rámdás. Vivid fancy and natural expression are the striking features of this whole piece. At first sight this

description of Satárá appears to be irrelevant to the subject the poet had in hand; but, after proceeding a little further, it begins to appear as an admirable part of a harmonious whole; for, the poet has brought Nárayan Rav with his uncle Rághobá Dádá to the Court of Rám Rájá for receiving the honors and dress of the minister or Peishwá at the hands of the Chhatrapati. This ceremony of investiture was necessary according to the national custom, still in vogue at Native Courts. As the first scene is laid at Satárá, it does not appear irrelevant, if the poets' muse turns a little to its description. The full Darbar of Rám Rájá calls the attention of the poet next, who has painted it with a felicity—not to be found in the other four prize poems. The story of the Darbar, if viewed from the strict stand-point of history, is much loose and introduces such personages as Holkar and Scindia as the grandies of the Darbar—a position to which they had not risen at the time—yet, if it be looked upon from the poetical point of view, the story of the Darbar is very fine. After the Darbaries had taken their seats the Darbar is opened with the introduction of Narayan Rav to the Chhatrapati. The Maharaja at seeing Narayan Rav, remembers the last Peishwa Madhav Rav, a hardy warior and a skilful diplomatist whose sudden and untimely death he laments and whose noble services he praises in high terms. Scindia is made to join the Maharaja and the whole of the Darbar becomes gloomy at the remembrance of Madhav Rav. Then follows the ceremony of investiture—accompanied with a few

but striking words of advice to Narayan Rav from the Maharaja on the duties and responcibilities of a minister of state. Holkar and Scindia join in extolling the Maharaja for his admirable advice. The language they use, being pure kumbi, adds charm to their sentiments. The Maharaja then turns to Raghunath Rav and exhorts him to devote his attention to the affairs of administration and to have an anxious care for the interest and welfare of his nephew, as, he was very young and destitute of paternal adviser. Thus ends the first of the five cantos into which the poem is divided.

The second canto carries the story to nearly half its length. The poet has gone over this part of the story in rather a hasty way, while some of his rivals have spun out this part to a tedious length. Neither the ways is unobjectionable. When the newly invested Peishwa returns to Poona, all but Anandi Bai display their heartfelt joy in a variety of ways. She is the only soul in the whole of Poona that feels unhappy on the occasion. Her ambition would not allow her to remain contented unless she saw her husband assume the Peishwaship. She is represented as given up to day-dreaming and engaged in contriving plans for obtaining that high post for her husband. An event favourable to the fulfilment of her design occurs. A Darbar is held to consider what should be done with regard to the demand of Hyder for a certain sum of money as tribute to him. The opinions of Narayan Rav and Raghoba Dada clash. Dada is irritated to an extreme. He leaves the Darbar abruptly and goes home. There, his wife

finding a fit opportunity for carrying out her wicked intentions, complains of her ill-treatment by Narayan Rao and his wife Gangabai and so takes her husband up into her net that the poor man gives her a letter, which serves her as a pivot round which to move her plot. She calls in Sumersing and makes him promise her his services in any cause or direction. Thus ends the second canto. The exciting speech of Raghoba Dada in the Darbar, as well as the soliloquy of Anandi Bai evinces considerable power on the part of the writer to express his sentiments befitting the occasion.

The third canto is devoted to the description of the Shanwar Wada, its present and past state and the Council Hall inside it. The picture of the Ranga Mahal is a fine specimen of the poet's fancy. The description of the gallery of pictures is also true to nature and manifests the delicate taste and forcive imagination of the poet. To this charming place Narayan Rav repairs and finds his young and lovely wife lying asleep in her bed. The soliloquy of Narayan Rav on this occasion in reference to Ganga Bai beautifully delineates the sentiments of the Peishwa regarding her. At this movement, she, having suddenly started from her sleep and opening her eyes, to her surprize finds her husband standing before her, all well and happy! Narayan Rav seeing her confused and bewildered inquires the cause of such a state. The wife informs him that a very harassing and ominous dream which she just then had beheld, occasioned it. The speech of Narayan

Rav to show the absurdity of her belief in the efficacy of the dream she had dreamed, though fine both in expression and thought, is too high for the clear comprehension of a woman like Ganga-Bai for whom it is intended. With this speech of Narayan Rav closes the third canto. This and the first canto are very creditable to the writer as a poet.

The fourth canto is very small and serves only to introduce Sumersing in the bed-chamber of the Peishwa, where of course a few words are exchanged. The poet begins with the description of the Jamadar of the Gardees, his person, his costume, his manners, his manly air, his stubborn countenance—and leads him to the Palace, where he finds Narayan Rav asleep. By the din produced by the stamping of feet &c. of Sumersing and his followers, the Peishwa is startled from his sleep. The deportment of Sumersing at this interview is that of an obedient and quiet servant. The Peishwa asks him the cause of his coming over to him at that time, to which the Rajput replies by demanding the arrears of pay due to the irregular infantry. The Peishwa promises to pay them to a farthing, but asks Sumersing to go to Nana Phadnavis, the treasurer, for the payment. Sumersing (his mission not being to demand the arrears) says in reply that he must have them there and then, knowing well that the Peishwa was not in a position to do so. Thus abruptly ends the fourth canto.

The fifth and the closing Act of the poem is a master-piece and is equal to the incidents described. The crowning act of Sumersing's promise to

the wicked Anandi Bai is the subject treated here. While Raghunath Rav is engaged in the worship of Shiva, he hears a loud clamour in the Palace. He sends his servants to inquire what was going on there. They inform him that Narayan Rao is pursued by the Gardees. In the mean time, the Peishwa runs up to his uncle to seek refuge. The nephew makes pitious entreaties to the uncle to protect him from the ruffians. The susceptible heart of the uxorious Dada, though poisoned by his wicked consort, is melted and he promises him every assistance in his power and assures him that he need not be afraid of his life. He orders Sumersing to go away, with a threat that, in case he stood there, his life should be lost. Sumersing succumbs to the order of Raghoba Dada and the exhortations of the young Peishwa ; when Anandi Bai comes in and excites Sumersing to the action, at which the hardy soldier and his followers take up their swords and cut Narayan Rav to pieces. Then follow the poet's own thoughts on the brutal action, which though few are sweet and striking. Thus ends the poem.

In this poem, the sentiments proper to different occasions are on the whole well developed and expressed. The felicity of expression and simplicity of diction, are the prominent qualities to be observed throughout the poem. The description of places is always natural and vivid. Exaggeration, which, with many, is a marked trait in composition, is met with but very rarely here. The poet has shown in many places that he has a correct idea of what natural beauty is. Many of his rivals on the pre-

sent subject have exhibited that total want of appreciating Nature. In short, the poem in hand seems to me to be a meritorious and successful attempt at poetic writing.

RAVJI S. GODBOLE,
Secretary to the D. P. Committee.

---

This poem A is chiefly written after the model which has become popular since the author of "Shivaji" wrote his work. The metre is simple, there are no ornaments of style, and the course of the poem sounds roughly like a mountain stream. The English model of such pieces is that of the "Last Minstral" and 'Marmion' of Sir Walter Scott. His Lady of the Lake is a higher effort. It is essential for the success of work written on this model that the descriptions and the incident related and the characters described should have a great strength of passion and virtue.

M. G. R.

# श्रीमंत नारायणराव पेशवे यांचा मृत्यु.

## मराठी काव्य.

"स्त्रीणामशिक्षितपटुत्वममानुषीषु
संदृश्यते किमुत याः प्रतिबोधवत्यः!"
शाकुन्तलम्.

## सर्ग १.

### प्रस्ताव.

सातारा व तेथील किल्ला.

पुरी शाहुची ही पहा अग्रभागीं
पहा दुर्ग तो! भीति दे दृष्टिलागी! ।
असे भव्य शोभा, असे रम्य झाडी
जिथें देश सारा विराजे पहाडी ! ॥ १ ॥
शिवाजी जिथे तो लढाऊ मराठा
स्मरे मानसीं, शौर्य-चातुर्य ताठा ।
अहा! कीर्ति मोठी तुझी बा शिवाजी
तुझी शोभते सर्वथा रे तुलाजी ! ॥ २ ॥

मानसिक विचार.

गमे कर्णि या शब्द येतात आतां
मनःकल्पनेमाजिं मी मग्न होतां।
"अभाग्या नरा! व्यर्थ आशा तुझी ही
तुझें स्वप्नसृष्टींत बा चित्त राही ॥ ३ ॥
वृथा मानसीं होशि तूं खिन्न कां रे!
घडे वैभव भ्रष्ट तेव्हांच सारें!।
बुडाली मराठी-बुडे पेशवाई!
महाराष्ट्र तें काळचक्रांत जाई ॥ ४ ॥
फिरुनि तो शिउबा तुज ना दिसे
तुजसि लागुनि जाइल बा पिसें!।
धरिशि उच्च मनोरथ कां वृथा!
विसर ते दिन दुःखद सर्वथा ॥ ५ ॥
विगत वैभव जें तव भूमिचें
स्मरुनियां करिं सेवन तूं तिचें।
स्वकवनें सुख दे निज भूजनां
धर निरन्तर ही हृदिं वासना!" ॥ ६ ॥
असे शब्द किल्ल्यांतुनी येति घोर
वदे तेथ जों सृष्टिचातुर्य थोर।
कड्याच्या वरी बैसतां ते मराठे
नसे पेशवे भेटती काय वाटे! ॥ ७ ॥
गमे युद्धतीर्थांत जे मग्न झाले
तयांचा थवा वायुरूपेंच बोले!।
म्हणे "वीर हो वृत्त सांगा सगर्व
तया काळिंचें!" तों घडे शांत सर्व ॥ ८ ॥

पडे बंद वारा—न घोंगावतो ही
न ऐकें तयामाजि मी शब्द कांहीं ।
"वृथा वायुनों क्षोभतां कां नितांत"
असें बोलतां हो दिशा सुप्रशांत ॥ ९ ॥
सातांऱ्या! स्थिति बघुनी तुझी अगाई !
कोणाचें हृदय विदारुनी न जाई ।
राष्ट्रें तीं प्रबळ महान भग्न होती—
बा मित्रा! मग तव कायशी कथा ती! ॥ १० ॥
किती भव्य किल्ला तुझा रम्य राहे !
किती उंच त्याचें अहा अग्र आहे ।
तुमानी न अद्यापि जो वादळातें
मराठा जसा शूर त्या यावनातें ! ॥ ११ ॥
अहा ! कोट त्याचा जणों वज्र भासे
करी व्यक्त जो स्वामिचें तेज खासें ।
जरी नष्ट झाला पती मावळ्यांचा
सख्या ! स्मारिशी थोर आत्मा तयाचा॥ १२ ॥

किल्ल्याचें वर्णन.

तट तुझा गिरिच्या शिखरावरी
सहज दे विळखे बहुतांपरी ।
जणुं भुजंग उदंड विशाळसा
पसरुनी परिरक्षि ससाध्वसां ! ॥ १३ ॥

आंतील देखावा.

नगर त्यांत जणों वसलें असे
गिरि अहा ! स्वशिरीं धरि तें कसें ! ।

गृहसमूह तयांत बरा दिसे
जन जयांमधिं भासति यक्षसे ॥ १४ ॥
कैलास जैसा दिसतो शिवाचा
तैसा शिवाजी-कृत-दुर्ग साचा ।
विस्तीर्ण वप्रें करि सर्प-साम्य
जो नीलकंठासम नील रम्य ॥ १५ ॥

आंतील राजवाडा.

पहा राजवाडा तसा रम्य फार
असे रम्य छाया, सुशोभा अपार ।
गमे श्वेत हा मत्तमातंग काय
कडयाच्या वरी ठेवुनी राहि पाय ! ॥ १६ ॥

तळीं.

तळीं जागजागीं मनोहारि येथें
जळीं क्रीडती मत्स्य मौजेंत जेथें ।
जळाचा अहा ! उंच जागींहि सांठा
शिवाजी! तुझ्या सत्कृतीचाच वांटा ! ॥ १७ ॥

राजारामहाराजछत्रपति.

राजारामा! धन्य सारे वडील!
तूंही राया धन्य मोठा सुशील ।
या काळीं त्या भोगिशी वैभवातें
जें यत्नानें प्राप्त हो पूर्वजांतें ॥ १८ ॥
सातारा हा सर्व आहे त्वदीय
किल्ला जंगी हा तुझा तेंवि होय ।
ही सामग्री युद्धसंग्रामकार्या
आहे सारी त्वत्करीं आज आर्या! ॥ १९ ॥

किल्ल्याचा दिंडीदरवाजा.

प्रचण्ड द्वारें ये सहज बहु शोभा तरि किती
बळाची किल्ल्याच्या करिल जन तो कोण गणती! ।
अहा! उंची त्याची मज न बघवे सत्य सगळी
पहावें तों जाती नयन फिरुनी येइ उकळी! २०॥

कोठें कोठें दारु-संपूर्ण राहे
लोखंडाचे थोर गोळे पहा हे ।
कोठें तोफा मांडिल्या थोर थोर
कोठें मोठीं युद्धवाद्येंहि घोर ॥ २१ ॥

अम्बाबाईचें स्थान.

अम्बाबाई! हें तुझें पुण्यधाम
अम्बे! तूतें मानिती सर्वकाम ।
आशा देवी! तूं मराठ्यांस सारी
दुःखा त्यांच्या आदिमाता निवारी ॥ २२ ॥
शिवाजीस तूं खड्ग देशी भवानी
गुणां जो तुझ्या अम्बिके नित्य वानी ।
जयाचा तया तांबडा देशि झेंडा
तदा शासि तो शूर या आर्यखण्डा! ॥ २३ ॥
पहा! मागुती लागली दाट झाडी
पहाया किती वाटते फार गोडी ।
किती उंच किल्ला! दरा खोल कोठें
मनीं दाटतें सत्य आश्चर्य मोठें ॥ २४ ॥
सभोंतें किती डोंगरी रान माजे
अनेकां तरूंनीं सदा जें विराजे ।

करावा गमे स्नेह कीं या नगांचा
असें सौख्य दे वास पुष्पादिकांचा ॥ २५ ॥

करमरी बकुळी वनआंवळी
करमळी करवंदिहि बाभळी ।
सुभग केतकि जांभळ बोरे ती
अमित ते वनपादप ये रिती ॥ २६ ॥

वरि वरी चढती विविधा कडे
बहु जयांवरि खेळति माकडें ।
विविध रंग मनोहर शोभती
सुखद फार वनस्थलि वाटती ॥ २७ ॥

प्रांतस्थ हे सकळ पर्वत काय राजे
स्वस्थ स्वमंदिरिं जणों बसती सुखें जे ।
पोषाख रम्य हिरवा बरवा तयांनीं
केला असे, पसरिले मग पाय ज्यांनीं! ॥ २८ ॥

हा सातारा खोल देखा वरोनी
झाडी राहे त्या गृहांतें भरोनी ।
जेथें तेथें चालती लोकसंघ
वाटे चाले हा जळाचा महौघ ! ॥ २९ ॥

पदार्थ सारे दिसतीं लहान
खालून जे हो गमती महान ।
झुंडीवरी झुंड दिसे नगांची
ही धन्यता सृष्टिविनायकाची! ॥ ३० ॥

किति मनोरम त्या क्षितिजावरी
चिकटले दिसतीं विविधा गिरी ! ।

कितिक उंच किती अतिनीच ते
धनिक निर्धन साम्यच पावते ॥ ३१ ॥

फिरे अंतरिक्षांत पक्षी जसा कीं
तयाला दिसे प्रांत सर्वत्र लोकीं ।
तसा देश सारा दिसे सूक्ष्म फार
मनाला गमे हर्ष तेव्हां अपार ॥ ३२ ॥

कुठें देवळें काढिती उंच टोकें
पताका कुठें वायुवेगें फडाके ।
सुवर्णध्वजाचा शिरोभाग कोठें
झकाके-तदा प्रेक्षकां हर्ष वाटे ॥ ३३ ॥

नानातऱ्हेचे खुलतात वृक्ष
जे शोभवीती क्षितिचे सुकक्ष ।
ज्यांच्यावरी मेळविण्यास भक्ष
पक्षी हजारों पसरी स्वपक्ष ॥ ३४ ॥

झुळझुळां जलनिर्झर वाहती
हळु हळू नदसंघहि चालती ।
जलतटावरि आम्र विराजती
फळभरें समयीं अति वांकती ॥ ३५ ॥

अनेक फलवृक्ष भूवरि तसे सुखें वाढती
मुखा पसरिती जणों अखिल तज्जनां मार्जिती ।
सुगंध अतिमंद तो पवन त्या स्थळीं चालतो
अशांत अति दुःखि जो नर न काय दुर्भाग्य तो! ३६

पुढें नयन टाकितां परळि रामदासाचि ही!
जया शरण जाति जे जन न दुःख त्यां लेशही ।

शिवाजि गुरु-पूज्य हा ! अर्जुनें सर्व ज्या वंदिती
अगा सुपुरुषा! असो गुरुवरा तुला मन्नती ॥ ३७

या टेंकडीच्या अवलोकनानें
प्रसन्नता भोगिलि ज्या जनानें ।
त्याच्या सुखा पार असेल कांहीं
देशाभिमानें न भरेल कीं ही? ॥ ३८ ॥

अरिस्टाटलानें शिकंदर जसा कीं !
असे शिक्षिला पूर्वि तो ग्रीकलोकीं ! ।
शिवाजी तसा शिक्षिला रामदासें
करोनी तया शूर मोठ्या प्रयासें! ॥ ३९ ॥

स्वधर्माभिमानें जळे जो त्वरेनें
दिलें आपुलें शौर्य कीं राघवानें ! ।
शिवाजी! शिवाजी! तुझी धन्य राया!
अम्हीं वांचतों या जगीं आज वांया ॥ ४० ॥

क्षणोक्षणिं स्मृती तुझी घडतसे अम्हां दुर्भगां
प्रताप तव! काळ तो, गुरुसमर्थ तो थोर गा ! ।
तुझ्या जननिच्या परी क्वचित या जगीं मावली !
धरोनि नवमास जी उदरिं रत्न तें भागली! ॥ ४१ ॥

जिजाबाई! बाई! सदृश तव माता न असती
न आतां या देशीं तुजसम असे कायच सती ! ।
दशा या भूमीची बहुत सखये ! दुःसह घडे
पडे होतां क्षीण क्षितिवरि म्हणोनी बहु रडे ! ॥४२॥

न धन तें बल तेंवि न शौर्य तें!
पतन मन्दहि हो उडवी तितें ।

अति उदास निराश फिरे जन !
उदरपोषण गुंतवितें मन ॥ ४३ ॥
गुरू रामदासापरी सर्व गेले !
अहा ! दुष्ट काळें कसें त्यांस नेलें ।
अहा ! मावळ्यांचा पती मावळे ना
कशी मा वळे अन्यदेशीं कळेना ! ॥ ४४ ॥

## कथानकास प्रारंभ.

### राजाराम महाराजांचा दरबार.

असो शाहुच्या सत्पुरीमाजिं आतां
भरे जी सभा ती पहा मार्ग जातां ।
बसे रामराजा महाराज मोठा
न राज्यांत ज्याच्या सुखालागिं तोटा ॥ ४५ ॥
असे भव्य बांधा असे रम्य मूर्ती
गुणांची जयाच्या तशी फार कीर्ती ।
असे खोल मुद्रा मनीं थोर शांत
पुरी धूर्तता दावि जो या जगांत ॥ ४६ ॥
पहा बैसला हा महाशूर शिंदा
उभा घेउनी नित्य तर्वार बंदा ।
मुखश्री असे काय शोभायमान !
किती पीळ अंगीं ! बळाचें न मान ! ॥ ४७ ॥
शिपाई गडी तो दुजा दृष्टि फेंका !
पहा नीट हा वीर व्हल्कार बांका ।

कसा आसना देउनी बैसलासे !
धरी नेटका खड्ग हातांत वासें ॥ ४८ ॥
किती रंग त्याच्या मुखीं तो झकाके !
किती तेज या सुप्रसंगींच फांके ।
मिशा सारि जो थोर एका करानें
तसा एक कर्णींच जो मंदिला ने ॥ ४९ ॥
पहा नेत्र त्याचे ! किती त्यांत पाणी
किती भव्य मूर्ती असे ती शहाणी ।
किती भर्जरी वस्त्र घेतां विराजे !
गुणी जो तया सर्व कांहींच साजे ॥ ५० ॥
आहेत ते पलिकडे रघुनाथराव
तें ब्रह्मतेज अतितीव्र न ज्यास ठाव ।
ज्यानें स्वयें धरुनि शस्त्र करीं रणांत
ते धाडिले यवन कालगृहीं अनन्त ॥ ५१ ॥
स्नानादिकर्मरत होउनि त्या नरानें
पूजादि सर्व विधिही करुनी श्रमानें ।
अत्यन्त कीर्तियुत उद्धरिला स्ववंश
जो स्त्रैण होउनि अहा ! करि सर्व नाश ॥ ५२ ॥
बैसे तयाजवळ तो फडणीस नाना
जो दाउनी चतुरता चढवी स्वमाना ।
अत्यन्त बुद्धिविभवें अजुनी जयाचें
गाजे जगांत अभिधान यथार्थ साचें ॥ ५३ ॥
साधा त्याचा सर्व पोषाख आहे
मुद्रा तैशी फार गंभीर राहे ।

बसे मोठया ः  दरानें सभेंत
जे मोठे ते हे त लोंकीं विनीत ! ॥ ५४ ॥

हा समाज भरला प्रबळांचा
वीरसंघ जमला अति साचा ।
'यांत मी बहु अयोग्य बसाया'
यापरी फडणिसांस गमे या ! ॥ ५५ ॥

सर्व तेंवि पटवर्धन मान्य
मण्डळांत बसले अति धन्य ! ।
विप्रही धरिति शस्त्र करांत
गर्व मानिति यथार्थ मनांत ॥ ५६ ॥

फडके हरिपंत बैसती
विनयानें तयिं वृत्त पाहती ।
अति दक्षच राज्यकारणीं
मतिचा थोर कुविघ्नवारणीं ॥ ५७ ॥

नसे गर्व कांहीं असे फार साधा
तशी त्यास कांहीं नसे अन्य बाधा ।
सदा पेशव्यांतें करी मन्त्रदान
गुणांचें खऱ्या यापरी होय मान ! ॥ ५८ ॥

सखाराम बापू पहा कारभारी
बसे त्या समाजीं असे धूर्त भारी ।
शहाणा तदा पेशवाईंत एक
असें बोलती वृद्ध अद्यापि लोक ! ॥ ५९ ॥

ग्रहांस रवि तो जसा प्रबळ तेज दे आपण
तसा स्थित तयांत तो गुणनिधान नारायण! ।

अहा बहुत योग्य हा तुजसि बंधु बा माधवा
कृतार्थ घडलासि तूं अनुज होउनी बांधवा ॥ ६० ॥
किती मुख सुरेख तें! रुचिर गौरकांती किती!
स्वभाव किति गोड तो! किति मनोज्ञ तैशी गती।
किती मधुर बोल ते! अमृतबिन्दु कीं सांडती!
गुणांस वय शोभतें किति नये दुज्या तोड ती ॥६१॥

तदा रामराजा महाराज यातें
मनीं हर्ष झाला, म्हणें पेशव्यातें।
"असे या अहो! राव! या येथ बैसा!
अम्ही मान द्यावा तुम्हांतें न कैसा?" ॥ ६२ ॥

उभी राहिली सर्व तेव्हां सभा ती
जणों सूर्य आला वरी सुप्रभातीं!।
महा कांतिनें नेत्र जाती दिपून
असो त्यास ते यापरी देति मान ॥ ६३ ॥

पुन्हा आदरें स्वासनीं बैसले ते
स्वयें बैसवी भूप नारायणातें।
क्षणानें स्थिती अन्य हो तन्मनाची
घडे त्या प्रसंगीं स्मृती माधवाची! ॥ ६४ ॥

अन्तरंग मम फार दाटलें
तों वदे स्मरण आज जाहलें।
"बैसला स्थलिंच या सुबांधव
आठवे अहह! योग्य माधव! ॥ ६५ ॥

"सुगुण तव ते राया! चित्तीं मला स्मरती पहा!
क्षितिवरि असे थोडा ऐसा महाजन तो अहा!।

सतत भरला सौजन्याचा विलक्षण अम्बुधी
तदपि न कमी शूरत्वेंही, विचित्र तशीच धी! ॥६६॥
"असे म्लेच्छांचा त्या कदनसमयीं काळच जसा!
प्रजेचा स्वप्रेमें जनकसम जो पोषक तसा!।
दयाळू प्रेमाळू बहुत कनवाळू नरपती
जनाचीं दुःखें कीं भिउनि बलिराज्यांत लपती!॥६७॥

"असे गादिचा फार या त्यास मान
अहाहा! पुन्हां होय कीं त्यासमान!।
मराठ्यांस तत्तुल्य निःसीम भक्त
मिळे काय अम्बे! अशां स्वामिसक्त" ॥ ६८ ॥

"अहा! माधवा! बा तुझ्या पूर्वजांचें
असें प्रेम होतें निघे कीं न वाचे!।
तुम्हीं पेशव्यांनीं सुसंरक्षिलें तें
अम्हां आज भोगावया प्राप्त होतें ॥ ६९ ॥

अहा! परि हिऱ्यापरा हरपलास कां कासया!
अकान्त घडला कसा सकळ थोर राष्ट्रांत या।
न जों अजुनि संपलें रुचिर सर्व तारुण्य तों
कसा तुजसि मृत्यु ने अधम दुष्ट चांडाळ तो! ॥७०॥

हे शब्द ऐकुनि समस्त तदा सभा ती
अत्यन्त हो चकित वाटुनि फार खंती।
होतात वीर नयनाम्बुविकीर्णदृष्टी
होई न कोण जन सत्पुरुषार्थ कष्टी? ॥ ७१ ॥

जें बोलला नृप मनोगत तें वदावें
शिंदा मनीं धरि असें, न तया रहावे!।

"त्ये राव मादव लई सरकार भोळ
ऐसा जगीं पुरुस तो इरळा कृपाळ !" ॥७२॥
ऐशापरी सकळ गाति गुणानुवाद
तो राजमंदिरिं भरे मग फार नाद ।
नारायण क्षुभित होय वदे न कांहीं
नेत्रांतुनी टपटपां गळती टिपें हीं ! ॥ ७३ ॥
"करा भाउजी! राज्य आतां सुखानें!"
रमाबाइचे ऐकिले शब्द त्यानें ।
जयीं येति तन्मानसीं निश्चयें ते
अहा! त्याक्षणीं दुःख झालें तयातें ॥ ७४ ॥
"दादा! आतां तुम्हि नारायणास
सांभाळाहो! अज्ञ या बाळकास! ।
तुम्ही दोघे तत्पिता तेंवि माता
सांगूं अन्तीं काय हो अन्य आतां!" ॥ ७५ ॥
मरणसमयिंचे ते शब्द सद्बांधवाचे
स्मरुनि हृदय झालें छिन्नविच्छिन्न त्याचें ।
स्वजनसुजननाशें कोण सौख्यांत राही?
नवल न जरि वाटे दुःख नारायणाही ! ॥७६॥
अस्ताचलाप्रति यदा अहिमांशु जातो
तो म्लान पद्मसमुदाय समस्त होतो ।
होतां सुहृज्जन विनष्ट अचेतनातें
हो दुःख फार मग केंवि न हो नरातें! ॥ ७७ ॥
बोले अनन्तर असें प्रभु रामराया
"आला असे दिवस तो करुं साजरा या ।

इच्छा असेल विभुची घडणार तें तें
दुःखी वृथा घडुनि कां मुकतां सुखातें ! ॥ ७८ ॥

"जो उपाय दिधला विभुनें या
तो करूं मिळुनि सर्व, पहा ! या ।
होइ हर्ष अभिषेक कराया !
या पुण्यांत बसवूं नवराया ! ॥ ७९ ॥

"आणा वस्त्रें सत्वरें सर्व आणा !
लाभे आह्मां पेशवा हा शहाणा ।
दुर्दैवें त्या यद्यपी माधवानें
हा भूलोक त्यागिला साभिमानें" ॥ ८० ॥

आज्ञा झाली तत्क्षणीं सेवकांची
होई गर्दी तेंवि मंत्र्यादिकांची ! ।
आलीं वस्त्रें भूषणें सर्व आलीं
जे मोठे ते सर्वदा सौख्यशाली ! ॥ ८१ ॥

चमकती कनकाभरणें किती
विलसती कुसुमें न घडे मिती ! ।
बहु तशीं तबकेंहि चकाकती
प्रबळ जे करि त्यांस रमा पती ! ॥ ८२ ॥

"नारायणास अभिषेक घडेल आतां
हा पेशवा बहुत होईल सौख्यदाता ! ।
वस्त्रादिकांस समजोनि असें जणों तीं
स्वामीकडे वळुनि हास्यमुखें पहातीं ! ॥ ८३ ॥

---

१. ( अर्थांतरन्यास ) 'जे प्रबळ त्यांचे स्वाधीन लक्ष्मी आपला देह करिते!!.

असो राजाराम त्वरित मग वस्त्रादिक धरी
स्वयें देई हर्षे सदय हलु नारायणकरीं ।
महाराजाला तो उठुनिच करी सादर नती
महानन्दें घाली सकळ निजअंगीं सुभग तीं ! ॥ ८४ ॥

वदे हांसुनी तो महाराज भोळा
"करा राज्य राया ! प्रजा नीट पाळा ।
तुह्मां दीर्घ आयुष्य तो ईश देवो
तशी अम्बिका नित्य तुह्मांस पावो ! ॥ ८५ ॥

"धरा नीतिमार्गा, धरा नित्य सत्य
वहा राज्यचिन्ता, पहा धर्मकृत्य ! ।
सदा दुष्ट दंडा तसे सुष्ट वंदा
भजा ईश्वरा नित्य आनंदकंदा ! ॥ ८६ ॥

"मिळे न्यायपंथें नरा सौख्य फार
सदा राज्यकार्यांत ठेवा विचार ।
अहा! दुष्ट अन्यायपंथें नरेश
किती पावले—पावती थोर नाश" ॥ ८७ ॥

"इच्छिती मनुज राज्यपदाते
कीं सुखप्रद विशेष असे तें ।
सर्वथा अहह! हा भ्रम आहे
जो घडे नृप तयास कळे हें!" ॥ ८८ ॥

"सुखद न असे राज्याची या जगीं पदवी अहो
मज गमतसे दुःखाचें यापरी स्थळ तें न हो! ।
सतत असती चिन्ता भूपा किती! गणना नसे
क्षितिपति तरी निद्रा रात्रीं न गाढ जया असे! ॥ ८९ ॥

"स्वयें काम जें सृष्टिच्या नायकानें
असे नेमिलें तें करावें नरानें ।
खरी गोष्ट ही मानसीं नित्य राहो
करा राज्य हें रावनारायणा हो!" ॥ ९० ॥

ऐकोनि होळकर हा उपदेश सर्व
सानंद डोलुनि वदे मग हें सगर्व ।
"म्हाराज ग्वॉड लइ ब्वॉलाति अक्किश वाचा!
वाट जनूच अवतार बिरस्पतीचा!" ॥ ९१ ॥

शिंदा म्हणे, बहु तयासहि ये हुरूप,
"त्ये काय राव पुसता ! सरकार खूप ।
ह्ये राज काय हकत्यात उगाच थोरॅ
वागापुड आमि बगा समदीच पोरॅ!" ॥ ९२॥

इत्यादि-शब्द बहु भूषविती समाजा,
दादांकडे मग वळे नृप रामराजा ।
तेव्हांच सद्गदित कंठ घडे जयाचा
चाले तशी क्षणभरी न तदीय वाचा ॥ ९३ ॥

"दादा! तुम्ही स्वशिशु हो पदरांत घ्या हें
केला अम्ही जरि तया अभिषेक आहे ।
ह्या बाळकास न तुम्हांविण अन्य कोणी
त्यातें तुम्हीच सरणी शिकवा शहाणी ॥९४॥

"पिता माता तुम्ही इतर अवघा बंधुजनही
असे हा नांवाला धनि तदपि तुम्ही निजगृहीं ।
चुकी या बाळाच्या वरि वरि घडे हातुनि तरी
क्षमा प्रेमें त्यातें करुनि शिकवा त्या अवसरीं! ॥९५॥

"स्मरोन मृतबांधवा कधिं न खिन्न नारायण
घडो स्वमनिं राघवा! खचित हा करावा पण! ।
तुम्हांप्रति न हें जरी शिकविलें अम्ही पाहिजे
प्रसंग पडतां असें सहज बोलणें भाग जें! ॥ ९६ ॥

दादा तदा बोलति ते वदान्य
"आज्ञा प्रभूची स्वजनास मान्य! ।
नारायणालागिं जसा असें मी
तैसे मला आपण सर्वकामीं!" ॥ ९७ ॥

झाली सभा ती बरखास्त जेव्हां
भालदार ललकारति फार तेव्हां ।
प्रत्यक्ष आनंद भरून ठेला
कीं या पुण्याला धनि गोड केला ॥ ९८ ॥

तो थाट, ती मौज, सुरेख चित्र
तें, रंग तो, हर्ष तसा विचित्र! ।
हीं आज ऐका कवितेंत मात्र
श्रोते तुम्हीं कर्णि, न नेत्रपात्र!! ॥ ९९ ॥

सर्ग १ समाप्त.

## सर्ग. २.

### अर्या.

हें पुण्यग्राम पहा निजपुण्यें पेशव्यांस लाभे जें ।
जें तद्यानुर्यानें वीरश्रीनें तसें पुढें साजे ॥ १ ॥

घडे दक्षिणेची बडी राजधानी
जयीं राहती लोक-देशाभिमानी ।
पडे दृष्टि पूर्वीं तशी लक्ष्मि तेथें
अनेकां गुणांचा असे वास जेथें ॥ २ ॥

वाडे मोठे बांधिले त्या सुकाळीं
जेव्हां धर्मे पेशवा लोक पाळी ।
राज्यामध्यें थोर होते शहाणे
होतें ज्यांचें दूरदृष्टी पहाणें! ॥ ३ ॥

वसति तेथ मनोज्ञ अशा कला
बहु पुरांत गुणीजन ठाकला ।
जनसुखार्थ पदार्थ सदा नवे
बनविती न कवीप्रति वानवे! ॥ ४ ॥

"किती लोक हौशी! उडे काय रंग!
पुण्यालागीं आतां अहा! तो न रंग! ।
अशा पेशवाई स्मरे आज सर्व"
असा मानिती वृद्ध अद्यापि गर्व! ॥ ५ ॥

जागोजागीं खेळलें रम्य पाणी
झाले जेव्हां पेशवे चक्रपाणी ।
श्रीरंगानें होउनी कीं प्रसन्न
लोकांसाठीं निर्मिलें क्षीर अन्न! ॥ ६ ॥

आर्या.

स्वारी श्रीमंतांची साताऱ्याहुनि पुण्यास ये परत।
तेव्हां काय पुसावें होती जन सर्व उत्सवांत रत ॥ ७॥

गुड्या तोरणें हीं पहा जागजागीं
नृपाच्या सुखाचे सदा पौर भागी।
अभागी असे नित्य जो तो उदास
सुखाब्धींतही दुःख होई तयास ॥ ८ ॥

जो दुष्ट त्यास बघवे न बरें दुजाचें
द्वेषेंकरूनि भरलें मन नित्य ज्याचें।
कोणासही सुख मिळे नच या भवांत
हा देहधारि असला जरि वैभवांत ॥ ९ ॥

आर्या.

नारायण राज्यावरि बसला झाले समस्त आनंदी।
आनंदीबाई परि नानंदी पडुनि काय हो बंदीं! ॥१०

"या पोराला मालक गादीचा करुनि आज हे बाई।
स्वस्थ चुलीशीं बसती काळ अम्हांकां न घेउनी जाई११
आग न किंवा लागे ऐशा या वैभवास आतांच।
वडिलपणा स्वीकारुनि
या पोराचा कशास घ्या जाच! ॥ १२ ॥

ऐसे मत्सरयुत हो
घोळति तन्मानसीं विचार यदा।
निजरिपुच्या नाशास्तव
निश्चय निश्चळ करी अघोर तदा ॥ १३ ॥

वृत्त काय घडलें इतुक्यांत

तें करा श्रवण होउनि शांत ।
होय कारण महा कलहाला
पेशवा तरुण ज्यांत बुडाला ! ॥ १४ ॥
बुडे सर्वथा ज्यामुळें पेशवाई
पुढें शेवटीं सर्व नाशास जाई ।
कलीनें जगीं थोर राष्ट्रें बुडालीं
हजारों शिरें मानवांचीं उडालीं ॥ १५ ॥

आर्या.

येई यवनाकडुनी
दरबारीं पेशव्यांस पत्र असें ।
द्यावा करभार तुह्मी
अथवा युद्धास सिद्ध व्हाच कसे ॥ १६ ॥
भरलें या गोष्टीचा
निर्णय करण्यास तूर्ण दरबार ।
शिंदे होळकरादिक
मानकरी जमति सर्व सरदार ॥ १७ ॥
नारायणास घेउनि
राघोबा बसति ह्या समाजांत ।
म्हणती "म्लेच्छ किती हा
बडबडतो बसुनियां स्वराज्यांत ॥ १८ ॥
"केली क्षमा आजवरी तयास
आतां करा शासन थोर खास ।
हा दुष्ट उन्मत्त घडे नितान्त
द्यावा कसा आज तया कृतान्त ! ॥ १९ ॥

"शिवानष्ट ही जाति अत्यन्त खष्ट
तयाच्या मुळें सोशिले फार कष्ट ।
जसा सर्प तो न क्षमेलागिं पात्र
तसा म्लेच्छ हा मारुं या हो सगोत्र! ॥ २० ॥

"लढाई करा खास म्लेच्छासवें या!
अह्मी सज्ज आहों रणीं हे मराया।
असें बोलती सर्व ते वीर बांके
तदा शस्त्रतेजें सभा ती चकाके! ॥ २१ ॥

आर्या.

रघुनाथ राव पुनरपि
बोलति नारायणा तुझें स्वमत ।
सांगुनियां वीरांतें
वीरश्रीसह करीं तयांस रत!" ॥ २२ ॥

वदे पेशवा तो तदा बालभावें
"अहो शूरहो! सावधान श्रवावें!
तुह्मी योग्य सारे तसे शूर काका
असावी अह्मां अन्तरीं काळजी कां? ॥ २३ ॥

"म्लेच्छ सत्य तुडवाल या क्षणीं
जाल हो उठुनियां जरीं रणीं ।
वाटतें स्वमनिं खास मला हें
अग्निला तृण पदार्थ न आहे!" ॥ २४ ॥

आर्या.

"पर्जन्याचे परि दिन
आले अत्यन्त हे समीप पहा!

यास्तव संप्रति तुह्मी
धीर धरुनि आपुल्या गृहांत रहा" ॥ २५
शिशिर ऋतू येई तों
स्वस्थ तयारी करा स्वसैन्याची ।
करभार पाठवा तों
जों न भरे झोळि शत्रुपापाची" ॥ २६ ॥

श्रवण करुनि ऐसे शब्द नारायणाचे
त्वरित फिरुनि गेलें चित्त साऱ्या सभेचें ।
ह्मणति सकळ हर्षें "पेशवा गोड बोले !"
बहुत तदपि दादा रुष्ट होऊन गेले ॥ २७ ॥

आर्या.

रघुनाथराव गेले सोडुनि दरबार फार रागानें ।
कीं अपमान समाजीं केला निःसंशयेंच पोरानें ॥२८॥
होई चकित सभा बहु, नारायण खिन्न मानसीं होय ।
बोले 'मम वचनाचा यावा काकांस रोष हो काय ॥२९॥

वांटिती त्वरित पानसुपारी
जाइ गर्दि उडुनी मग भारी ।
जाति ते निजगृहीं सरदार
भीति ज्यांसहि गमे मनिं फार ॥ ३० ॥

आर्या.

दादांच्या अंगाचा
झाला संताप तो गृहीं थोर ।
बोले पुनरपि चित्तीं
"नारायण! कालचेंच तूं पोर!" ॥ ३१ ॥

गर्वें अक्कल मजसीं,
शिकवाया लाज वाटते न तुला।
खवळे न चळे तन्मन
टोंचति कीं शर तदीय हृदयाला ॥ ३२ ॥
आणंदी बाईच्या
मंदिरिं तैसाच नेटका गेला।
केला त्या कृत्येनें
जालबलें मीन बद्ध तो केला! ॥ ३३ ॥
कपटशब्द पतीसह बोलली
अधिक तन्मति दूषित जाहली।
बहुत पोर असे गृहिं माजला
झट उपाय करा तरि याजला! ॥ ३४ ॥
"मदपमान अतीव गृहीं करी
सकळ केंवि तुम्हांस रुचे तरी।
खचित बांधियलीं करिं कंकणें
मजसि भाग असे अजि बोलणें! ॥ ३५ ॥
"टाकून बोले सटवी हि सून
घरीं धनी काय तुम्ही असून।
कोणी मला आज जगीं न मानी
होती पहा चाकर बेइमानी! ॥ ३६ ॥

आर्या.

"याला दुनियेंतुन या
काढा बाहेर, अन्य युक्ति नसे।
तों झिटकारुनि दादा
म्हणती "होईल हें अनिष्ट कसें! ॥ ३७ ॥

अन्तीं पतीचें मन ती
वळवी बोलोनि शब्द रागाचे ।
हा बोले "कर पुसतां
मजला नच जें तुझ्या मनास रुचे" ॥ ३८ ॥
'धरावा' असें पत्र देई लिहोन
बहू हर्षली जाय तेव्हां निघोन ।
मनीं योजुनी घात नारायणाचा
म्हणे 'ये कधीं दीन देवा सुखाचा?' ॥ ३९ ॥
सुमेरसिंगाप्रति तूर्ण दासी
धाडोनियां आणवि ती तयासी ।
युक्ति प्रयुक्ती लढवोनि थोर
घेई प्रतिज्ञा करवोनि घोर ॥ ४० ॥

आर्या.

विश्वासू परि भोळा
आहे जाणून ती वदे त्यास ।
'कार्य स्वकीय कांहीं
करिशिल कीं बोल गुप्त रे खास?॥ ४१ ॥
'तुझी कीर्ति मी ऐकतें फारदीन
तुझें शौर्य मोठें तसें तें इमान ।
तुझ्या जातिच्या वीण हें काम सिंगा
न फत्ते घडे, केंवि अन्यास सांगा?" ॥ ४२ ॥

आर्या.

घेवावि ती त्याकडुनी,
बोलुनियां मधुर, बेलभंडारा।
वचनास गुंतला तों
सांगे मनिंचा विचार ती सारा ॥ ४३ ॥

सर्ग २ समाप्त.

## सर्ग ३.

[ शनवारचा वाडा. ]

पुढें भव्य वाडा पहा थोर आहे
पहोनी कसा पर्वतप्राय राहे! ।
किती उंच भिंती, किती भार जंगी
न भंगे गमे अंग ज्याचें सुरंगीं* ॥ १ ॥
प्रबळ, थोर, विशाळ विराजती
बुरुज; वेष्टिति सर्व सभोवतीं ।
गमति दिग्गज रक्षिति त्या गृहा
भयद वर्णहि नील असे पहा! ॥ २ ॥
किती आंत शोभा! किती गार वाटे
जनांच्या मनीं, जाय जो त्याच वाटे ।
चमत्कार जेथें असे सर्व ठाईं
तऱ्हेच्या मजेच्या किती थोर सोई! ॥ ३ ॥

* सुरुंगांनींही न फुटण्यासारखें.

गजबजे जिकडे तिकडे किती,
अमित सेवक संतत राबती ।
भरुनि वैभव राहतसे सदा
करिति राज्य सुविप्र सुखें यदा ॥ ४ ॥

परि अहा! स्थिति आज कशी घडे
न बघवे सुजनास तिच्या कडे ।
पळभरांत निवर्तति पेशवे
अहह! कर्मदशा, नच बोलवे ! ॥ ५ ॥

ज्या स्थळीं सकळ थाट मिळाला
गर्व विप्ररिपुचाहि निमाला ।
ब्रह्मतेज पसरे बहु जेथें
ताम्रवर्ण भरला घन तेथें ॥ ६ ॥

शास्त्रयुक्तविधिपावन झाली
*पुण्यशील नृपराजहवेली ।
ती अहा! यवन दूषित होई
म्लेच्छ त्यांत करिती बहु सोई! ॥ ७ ॥

असे ध्वस्त सारें, न वाडा, न कांहीं
न हो पूर्विचा वासही आज राही ।
पडे थोर मैदान वारा झळाळे
मना त्या स्थळीं येनि आतां उमाळे! ॥ ८ ॥

स्थळीं राबती माणसें ज्या हजार
सदा सेवनीं स्वामिपादांसमोर ।

---

* या चरणांतील समासांत 'हवेली' हा यावनी शब्द मुद्दाम 'पुण्यशील नृपराज' या संस्कृत शब्दांशीं संयुक्त करून शब्दरचनेवरून यथार्थ ध्वनित केला आहे.

दिसे सर्व उध्वस्त पर्यस्त आतां
न कोणी विचारी, पुसे तेथ जातां ॥ ९ ॥
उभा पाहरा नित्य जेथें शिबंदी
असे आंत जाण्यास म्लेच्छांशि बंदी।
असे शान्त सारें, नसे त्रास जेथें
करी मंडई थोर कल्होळ तेथें ! ॥ १० ॥
महा शूर शिंदे तसे वीर अन्य
जिथें येउनी बोलती 'विप्र धन्य!'।
जहागीरवाले, बडेजाव ज्यांची
घडे ज्या स्थळीं नित्य गर्दी अशांची ॥ ११ ॥
अहा ! त्या ठिकाणीं पहायास जातां
विके भाजिपाला ! पडे भूस आतां।
बसे येथ काची बसे बागवान
विपत्ती सदा देइ काळास मान ! ॥ १२ ॥

आर्या.

कारंजावरती ज्या
देहा अर्पी सवाइमाधव तो।
हर ! हर ! आतां तेथं
शूद्र तसा म्लेच्छ कावडी भरितो! ॥ १३ ॥

वाड्यांत सुंदर असे नृपराज याचें
मंदीर, वर्णन न हो करवे जयाचें।
लक्ष्मी प्रसन्न असुनी करि वास जेथें
राहे उणीव कसली मग सत्य तेथें? ॥ १४ ॥
महाल नारायणराव यास
शोभे तसा तन्नवयौवनास ।

प्रत्यक्ष आनंद करी स्ववास
ऐसें गमे जेथ सदा जनास ॥ १५ ॥
सहस्र कारागिर त्या स्थळास
अनेकवर्षें करुनी प्रयास ।
समस्तचातुर्यबळें सुशोभा
देती, अशी अप्रतिमा यशोभा! ॥ १६ ॥
कनकवर्ण मनोज्ञ चक्राकृती
बहुत यत्किरणें मग फांकती ।
किति विलक्षण हें चमके रुपें
धन अहा गणती न किती खपे! ॥ १७ ॥
विलसणार सुरम्य रमापती
ह्मणुनि लक्ष कुबेरच मापती ।
सतत तेथ मनोहर वा सती
जणुं रमा झिजुनी करि वास ती! ॥ १८ ॥
समान्तरें स्तंभ उभ पहा हे
नक्षींत पक्षीजनसंघ राहे ।
वनांतुनी येति जणों घरा हे
ऐसें गमे प्रेक्षक यास मोहें ॥ १९ ॥
सकळ वृक्ष अहा! सुरुचे कसे
रुचिर रंग तयां हिरवा असे ।
मधुनि राघु मनोहर कोरिले
जणुं जिवंत धरोनिच ठेविले ॥ २० ॥
भिंतीवरी कसब दाविति ते चितारी
चित्रें विचित्र बहु काढुनि चित्तहारी ।

प्रत्यक्ष सर्व सजली जगुं सृष्टि अन्य
ऐसे गुणी करिति वास पुण्यांत धन्य ॥ २१ ॥

"हा जानकी सह वसे रघुराज येथें
वांके कपींद्र हनुमान् दृढभक्ति जेथें।
ते दुःखभागि वनिं पांडव शोभतात
ती धर्ममूर्ति विलसे मनिं फार शांत! ॥ २२ ॥

ती द्रौपदी, नकुल, तो सहदेव पार्थ
तो वीर सुंदर धनुर्धर भीम सार्थ।
तें घोर रान; अति उंच विशाळ शैल
जैं पांच बैसति अहा वनवासशील ॥ २३ ॥

बसे रुक्मिणीही बसे सत्यभामा
स्वयें सेविती प्रीतिनें सर्वकामा।
वनीं कृष्णजी सौख्यशाली विराजे
स्वयें धेनु चारी, मुखीं वेणु वाजे ॥ २४ ॥

दयार्द्र नारायण शेषशाई
लक्ष्मीसवें; त्यावरि दृष्टि जाई।
समुद्रकन्या हरिच्या पदातें
सेवीतसे जो हरि आपदांतें" ॥ २५ ॥

अशी चित्रमाला असे त्या महाला
घडावेंच कीं सौख्य नारायणाला।
महा भक्तिनें नित्य चित्रें पहावीं
न खंती परी जोडण्याला गमावी ॥ २६ ॥

---

१ भीम [ भयंकर ] या नांवास अनुरूप चित्र काढिलें होतें.

आर्या.

रत्नजडित पर्यंकीं
गंगाबाई बसे सुखें शयनीं ।
पाहुनि वाट पतीची
झाली अत्यन्त खिन्न ती स्वमनीं ॥ २७ ॥
चिंतेनें व्यग्र जिचें
चित्त पडे मग विचारपाशांत ।
येणें अजुनि न बाई
घडलें कां आज तें महालांत ! ॥ २८ ॥

असे बहुत देखणी, कुरळ केश ते हालती !
विशाळहि कपाळ तें, अति कृपाळ हो ती सती ।
परस्परगुणान्वयें बहुत शोभलें युग्म तें
चुके सतत, यास्थळीं विधि चुके न कीं मन्मतें ॥२९॥
कपोलतलिं देउनी कर सचिन्त साध्वी बसे
तिला स्वपतिनेंच तें भवन पूर्ण सारें दिसे ।
जिथे नयन टाकि ती गुणनिधान नारायणा !
त्वदन्य न तिला गमे, विसरली अहा मीपणा! ॥ ३० ॥
असा प्रेमा मोठा क्षितिवरि असे खास विरळा
सती अर्पी प्राण प्रियपतिपदीं काय सगळा ।
हंसावें बोलावें मृदु जवळ जेव्हां पति असे
विणें प्राणेशाच्या क्षणभर तिला चैनच नसे ॥ ३१ ॥
ह्मणे वारंवार "प्रियपति मला कीं विसरला
प्रतीक्षा मार्गाची करित बसतां काळ सरला ।
दिशा झाल्या शांत प्रचुर अवघ्या शीतळ पहा
न बाई येणें हो, विरह किति अद्यापिहि सहा!" ॥३२॥

जों वाट पाहे पतिची अशी ती
चित्तीं तिच्या फार तरंग येती ।
तों मत्सरी होउनि काय निद्रा
ये त्या सुकाळींच तिला अभद्रा ॥ ३३ ॥

पडे या दिनीं चांदणें पौर्णिमेचें
असे स्वच्छही तेज तेव्हां नभाचें ।
पडे चांदणें स्वच्छ गंगाननाचें
नृपाच्या मनीं नित्य यद्बिंब नाचे ! ॥ ३४ ॥

पडे नयन झांकुनी क्षणभरींच जों मंदिरीं
तिचा हृदयवल्लभ प्रिय अशांत ये सत्वरीं ।
परि श्रमुनि मञ्चकीं निजलिसे प्रिया पाहिली
वदे मग अहा ! सखी बहु मदर्थ हो भागली ॥ ३५ ॥

मनिं म्हणे मुख मोहक हें किती
कर शरीरिं लतांपरि शोभती ।
नथ कशी विलसे तव नासिकीं
विसरुनी* वर ठेविशि आज कीं ! ॥ ३६ ॥

निद्रिस्त तूं गे असतां पहावी
आशा अशी हें मन फार दावी ।
आहे प्रिया शांत किती शहाणी
हें साक्ष देई मुख ! रूपखाणी ! ॥ ३७ ॥

उपवनांत निरन्तर वाहतो
कुसुमगंधित वायु मनोज्ञ तो ।

---

* स्त्रिया निजतांना नथ काढून गळ्यांत घालतात किंवा शय्येच्या खालीं ठेवितात हें बहुधा प्रसिद्ध आहे.

श्वसित तेंवि गमे तर सुंदरी !
हृदय हें मम चन्द्रमुखी! हरी ॥ ३८ ॥

"आकाशाच्या मधिल सखये ! चन्द्र हा रूपराशी
गर्वानें गे खिडकिमधुनी पाहि या त्वन्मुखाशी ।
या चंद्राला परि बघुनि तो होय लज्जायमान
झांकी अभ्राम्बरिं मुख पहा खालिं घालोनि मान! ३९

"उठ, तुझी चल झोंप सखे पुरी
वद मशीं वचनें मृदु सुंदरी !"
म्हणुनि तो मुखचंद्र धरी करें
हळुच चुंबन भूपति घे त्वरें ! ॥ ४० ॥

"हो स्पर्श त्या मृदुकपोलतलावरी कीं
होई न जों, नयन तों उघडोनि टाकी ।
ही मुग्धि काय सखि बैस उठोनि आतां"!
राहे उभी उठुनि तों अति दूर कांता ॥ ४१ ॥

गंगाबाई मानसीं खिन्न झाली
निद्रेमध्यें कीं पती ये महालीं ।
खालीं लज्जायुक्त राहे उभी ती
किंवा स्वप्नीं वाटली फार भीती ॥ ४२ ॥

हृदय बहुत जीचें लागलें तें उडाया
धडधड अजुनी तो ऊर पाहे उठाया ।
अधर थरथरे तो कंप सर्वत्र येई
अहह ! भिउनि गेली यापरी गंगुबाई ॥ ४३ ॥

अधींच अबलाजन प्रबलभीरु लोकांत हो
हिच्या जवळ मंदिरीं नमुनि कांत एकांत हो !

पडे मुमुखि एकटी मग बघोनि कुस्वप्नही
भयें न सहसा कशी गडबडोनि जाईल ही? ४४
कष्टी अशी बहुत सुंदरि! बोल कां गे?
चिन्ता महान तुजलागिं कशास लागे? ।
ऐशी सखे! जवळ बैस धरीं न लाज
कां म्लान हें तव मुखाम्बुज सांग आज ॥ ४५ ॥
कोणी तुझा करि सखे! अपमान काय?
कां व्यर्थ गे झिजविशी मृदु फार काय! ।
असी निरंतर तुझ्या सखि! सेवनांत
कां भागशी तदपि जानकि कीं वनांत? ॥४६॥
गृहांत अथवा वदे वद कुशब्द कीं गे तुला!
प्रसंग गुदरे असा कवण आमुच्या राणिला? ।
न भीड धरि मानसीं, तुजसि वाटतें कां भय?
स्त्रियांस पतिच्या विणें इतर कोणता आश्रय ॥४७॥
परोपरी प्रेमभरें नितान्त
करी समाधान तदीय कान्त ।
कटाक्षयुक्त प्रणयें सती ती
होऊन प्रफुल्लित जाय भंतीं ॥ ४८ ॥
कवळुनि पतिलागीं देइ आलिंगनातें
श्रम सकळ सतीचे जाति तेव्हां लयातें ।
स्वजन गवसतां हो संकटीं, थोर कष्ट
त्वरित घडति सारे या प्रपंचांत नष्ट ॥ ४९ ॥
सुपर्यंकीं अंकीं बसुनि पतिच्या गद्गदरवें
वदे गंगाबाई मधुर, कविला तें न वदवे! ।

स्वबाहूपाशांनीं मदनसमूर्ति प्रियकरा
धरी, जैशी लक्ष्मी मजसि गमतें अम्बुजधरा ! ५०

किंवा मनोज्ञ रमणीय अशा वनांत
वल्ली तरूस कवळी समजोनि कान्त ! ।
सर्वत्र वायु सहसा सुटुनी प्रचण्ड
टाकी समस्त हलवून जयीं अखण्ड ! ॥ ५१ ॥

मन उघडुनी बोले साध्वी न भी तिळही धरी
सहज पडलें मी पर्यंकीं सख्या ! निजमंदिरीं ।
मजसि सहसा निद्रा लागे, कशी न कळे मला !
बहुत तुमच्या साठीं आत्मा असे जयिं भागला ५२

गतधवा वनिता निजमंदिरीं
हळुच येउनि हो मजला धरी ! ।
सकळ कुंकु पुशी मम भाळिचें
मग सहास्य घडे मुख तें तिचें ! ! ॥ ५३ ॥

दुजें स्वप्न तें पाहिलें दुष्ट बाई !
अजूनी मला भीति वाटे अगाई ! ।
अकस्मात काळा घुसे काळरूप
गृहीं कोणि या–फार विक्राळरूप !! ५४ ॥

कुस्वप्न ऐसें बघुनी भयानें
मीं मञ्चकीं हो उठलें त्वरेनें !
तों मंदिरीं वल्लभही न पाहें
दुःखें तदा मानस घाबरे हें ! ॥ ५५ ॥

गमे मत्कंठींचा प्रियतम अहा ! हार हरिला !
भगे बाई ! त्यानें अवचित गळा काय चिरिला ! ।

सखा माझा वाटे अहह! धरणीच्या वर पडे
अगे बाई! माझें हृदय अजुनी हें धडधडे! ॥ ५६ ॥

ऐसें ह्मणोनि भयकंपित सुंदरी ती
कंठीं पडे स्वपतिच्या वदवे न रीती! ।
हाहा! प्रिया! त्यजुनि कां मज आज जातां?
स्वप्नभ्रमें करि विलाप तर्दाप्य कांता! ॥ ५७ ॥

कवळुनी दयितेप्रति पेशवा
मग वदे खरि बाइलबुद्धि! वा! ।
तुजसि दे भय गे तव कल्पना
दुखविशी सखि! सत्य वृथा मना! ॥ ५८ ॥

स्वप्नें प्रिये! सतत होति न हीं कृतार्थ
दुश्चिन्ह हें तुजसि कां गमतें निरर्थ? ।
स्वप्नांत गे दिसतसे मनिं अन्य सृष्टी
तूं व्यर्थ कां घडशि अज्ञ नितान्त कष्टी? ॥ ५९ ॥

"व्यापार चाले, मन राहि जागें
संकल्प नानाविध वाढती गे ।
बुद्धी करी संयमना न त्यांच्या
आत्मा बघे गोष्टि परोपरीच्या! ॥ ६० ॥

गमे सोडुनी जीव देहास दे हा
करी स्वप्नसृष्टी धरी अन्यदेहा! ।
पडे कल्पनाबद्धजालांत–त्याशीं
घडे सौख्य किंवा भिडे दुःखराशी!! ॥ ६१ ॥

क्षण मशीं वद मंजुळ सुंदरी!
हृदयें भीति न कल्पित ही धरीं।

निकट हा हृदयेश तुझा असे
तरि गमे तुज स्वप्न खरें कसें? ॥ ६२ ॥
शिपाई किती ! पाहरा नित्य राहे
असे थोर वाडा तरी स्वप्न कां हें? ।
सखे ! मंदिरीं कोण येतां धजेल !
मला स्पर्शण्या छाति कोणास बोल? ॥ ६३ ॥
बसावें, हंसावें खुलावें, रमावें
सुखी सर्वदा या मुखानें दिसावें ! ।
असे भाग्य मोठें प्रभूचा प्रसाद !
धरावा तुवां मानसीं कां विषाद ? ॥ ६४ ॥
काका काकू आपुले मायबाप
आहे सारें—थोर पुण्यप्रताप! ।
नाना तैसे योग्य मन्त्री अह्मांस
वेळोवेळीं होशि कांगे उदास ? ॥ ६५ ॥
तुला बोलल्या शब्द काकू घरांत
तरी ठेविलें पाहिजे चित्त शांत ।
तुझ्या सासुबाई सखे त्या वडील
असे गे अह्मां प्रीतिचा कोण बोल" ॥ ६६ ॥
समाधान ऐसें करी पेशवा तो
सतीचा तदा खेद सर्वस्व जातो ।
सुखें मंचकीं युग्म तें झोंप घेई
सुनिद्रिस्त जो नष्ट तद्दुःख होई ! ॥ ६७ ॥

सर्ग ३ समाप्त.

## सर्ग ४.

जमादार तो नेटका शूर भाई
खरा पेशव्यांचा जुना जो शिपाई ।
स्वतां फौज सारी जयानें पहावी
रणाची स्पृहा नित्य चित्तीं धरावी ॥ १ ॥

असे वीर बांका खरा स्वामिभक्त
मनाचा खरा थोर जैसा सशक्त ।
सदा सत्य बोले सदा सत्य चाले
जयाच्या मुळें विप्रशत्रू निमाले ॥ २ ॥

प्रचण्ड ज्याचें अवघें शरीर
विचित्र मुद्रा अति थोर धीर ।
ती क्रूर दृष्टी, न भयें पहावें
सैन्यांत जीनें विविधा रमावें ! ॥ ३ ॥

तो डौल, तो मंदिल फार काम्य
तो थाट, ती ऐट समस्त रम्य ।
तर्वार शोभे कमरेस खाशी
शेला मजेचा लटकावि हौशी ॥ ४ ॥

हिन्दुस्थानी सर्व बाणा तयाचा
तो फौजेचा सर्व पोषाख उंचा ।
शस्त्रें खोंवी जेंवि पुष्पें, कटीला
वाटे ज्याची प्रेक्षकां गोड लीला ॥ ५ ॥

किती गोड त्याची सदा जीभ बोले
किती नम्रता! कल्पनाही न चाले ! ।

गुणांचा निधी सिंग तो काय वाटे
परी एकटया दुर्गुणें सर्व फाटे !! ॥ ६ ॥
प्रतिज्ञा केली जी दृढ न जन हे मोडिति कदा
घडावें सत्त्वाचें अनवरत कीं पालन सदा ।
'सकृत् जें बोलावें अननृत करावेंच' ह्मणती
खरें किंवा खोटें मग न बघती कार्य पुढतीं ॥ ७ ॥
देती राज्यें, भोगिती दुःखराशी,
"सत्त्वाखालीं सर्व" वाटे तयांशीं ।
सत्त्वाअन्तीं मानिती न्याय सारा
बाकी भासे संसृतीचा पसारा ! ॥ ८ ॥
हरिश्चन्द्र तो सत्त्वशाली पुराणीं
तसा राम, ती जानकी पट्टराणी ।
महाशूर ते पंडुचे पुत्र पांच
असे लागला मार्ग पूर्वी असाच ॥ ९ ॥

आर्या.

सेवुनि मिष्टान्नातें
येई नृप पर्वतीहुनी भवनीं ।
एकान्तवास सेवी
पडला क्षणभर तदा सुखें शयनीं ॥ १० ॥
"येउं न द्यावें कोणीं"
प्रभु दे आज्ञा अशी गृहद्वारीं ।
तों हा अनर्थ गुदरे
कोलाहल जाय होउनी भारी ॥ ११ ॥
होउं न देइ तयांचा
तो रक्षक मंदिरीं प्रवेश पहा ।

बोले सुमेरसिंग
'क्षणभर एकीकडे समस्त रहा' ॥ १२ ॥
त्वेषानें तो शिरला
अन्तीं नृपमंदिरांत न जुमानी ।
निद्रावश पति पाहुनि
मृदु शब्दें उठवि परि न अवमानी ॥ १३ ॥
तो पेशवा गडबडां उठला भयानें
केला सनम्र मग त्यास सलाम यानें ।
पायांवरी नृपतिच्या शिर सिंग ठेवी
गादीस मान निज यापरि योग्य दावी ॥ १४ ॥
वदे पेशवा प्रेमयुक्त स्वभावें
"असी भोगितों राज्य हें त्वत्प्रभावें ! ।
असे काय तें बोल रे थोर कार्य
मला आजकाळीं न कांहीं अकार्य ॥ १५ ॥
"आलास कां वद समस्त सुमेरसिंगा
इच्छा त्वदीय जन ने वद काय भगा? ।
किंवा पगार चुकला मिळतीं न वस्त्रें ?
फौजेस काय मिळती न नवीन शस्त्रें? ॥ १६ ॥
क्रोधावेश करोनी
प्रकट वदे सिंग आयका कानीं ।
"सैन्याला रोजमुरा दिधला
नाहीं समस्त काकांनीं ॥ १७ ॥
वर्ष घडे छत्रपती
परि न मिळाला मदीय लोकांस ।

सेवा करुनी प्रभुनी
न मिळावें काय अल्प पोटास !" ॥ १८ ॥
हे गारदी सकळ जीव मदीय घेती
पोटास मालिक जरी न तयांस देती ।
माझ्या सवें प्रभुपदाप्रति हे समस्त
आले पहा बनुनि निर्भय खास मस्त ! ॥ १९ ॥
तदा पेशवा सेवका हाक मारी
वदे 'कोणरे तो असे बोल दारीं' ।
'सवें घेउनी सर्व या गारद्यांतें
म्हणा बापुला द्या त्वरें रोज यांतें!' ॥ २० ॥
आतां येथें द्या अम्हां सर्व पैसा
या सर्वांचा हक्क आहेच ऐसा ।
"बापू नाना मानितों हे न कोणी
टाका थैली याक्षणीं या ठिकाणीं! ॥ २१ ॥

आर्या.

भूप म्हणे 'कोठुनि रे
देऊं थैली स्वमंदिरीं सिंगा!' ।
उमजुनि उलटें वदशी,
हसशी हा व्यर्थ मजवरी कां गा?" ॥ २२ ॥
'ममंदिर हें आहे,
या ठायीं ठेविती न भाण्डार ।
नानाप्रति सोंपविलें
आहेरे आमचें धनागार! ॥ २३ ॥

श्लोक.

सिंग तो खवळला जणुं सर्प
बोलला मग कठोर सदर्प ।
'गोड शब्द रुचती न असे हे
शर्करा न, विष भाषण आहे! ॥ २४ ॥
'पगार त्वरें या ठिकाणीं भरा हो
दुजी गोष्ट आतां नृपा दूर राहो! ।
निघे अन्यथा तीव्र नागीण नंगी
क्षणामाजि जी देह हा सत्य भंगी! ॥ २५ ॥
बाहेर बोलुनि असें तंव खड्ग काढी
म्यानातुनी सबळ ज्यास सरोष ओढी ।
संतप्त तो बहुत होउनि भूप बोले
यन्मानसीं कपट तत्क्षणिं सर्व आले ॥ २६ ॥

सर्ग ४ समाप्त.

---

१ तरवार.

## सर्ग ५.

श्लोक.

देवार्चनीं रत तदा रघुनाथराव
ते बैसनी करित हो जपजाप्य सर्व।
पूजासमस्त अटपे न षडोपचार
तों तत्क्षणीं गुदरला क्षण हा अघोर ! ॥१॥

झणझणे अवघें गृह त्या रवें
अति भयंकर जो नच वर्णवे।
दिन! दिन! प्रतिशब्द असा निघे
अहह! तो स्वमुखें द्विज कोण घे ! ॥ २ ॥

दणाणे पहा तत्क्षणीं सर्व वाडा
म्हणे कोणि हाणा ! वदे अन्य 'पाडा !'
परी यावनी शब्द तो 'दीन दीन'
करी पेशव्यालागिंहो 'दीन दीन' ! ॥ ३ ॥

पडे वीज वाटे, गमे मेघ गर्जे
परी दुष्ट तर्वार ही फार माजे।
असे ज्या गृहीं शान्त आनंद सर्व
कसें लोटलें तेथ हें दुष्ट पर्व ! ॥ ४ ॥

प्रळयकाळ भयाळ जणों स्वयें
अहह! पुण्यपुरीमधिं काय ये !
शिरति गारदि त्या भवनीं तसे
यवन धेनुकुलांत अहो जसे ! ॥ ५ ॥

आर्या.

दादांच्या कर्णी ते
देवगृहीं पडाति शब्द विक्राळ।
वीर तथापि गमे कीं
कोसळतें काय आज आभाळ ! ॥ ६॥

श्लोक.

तदा त्यांच्या अंगीं अतिनिबिड रोमाञ्च उठती
अतिक्रोधानें ते नयन सहसा ताम्र घडती ।
गमे अंतर्यामीं भयबहुत त्यातें क्षणभरें
म्हणे कांहीं आहे समय कठिण भ्रान्ति न उरे !॥७॥

अरे धोंडिबा ! कोण आहे दुआरे
पळा, या त्वरें वृत्त घेऊन सारे ! ।
असा कोण उन्मत्त वाड्यांत होई
वृथा कोणरे दुष्ट हा त्रास देई ? ॥ ८ ॥
" जा चांपाजी ! जा तुळाजी त्वरेनें
भंगातें ही कोण पूजा पहा ने ।
जा मूर्खानों पाहतां तोंड काय ?
बांधा त्याचा सत्वरें नष्ट काय !" ॥ ९ ॥
शोधास तों ते जन जाति कांहीं
वाड्यांत कां गार्दि भरोन राही ।
येवोनि दादांप्रति सांगतात
कीं 'कोसळे थोर गृहीं अकांत' ॥ १० ॥
क्रोधें करीं धरुनि शस्त्र सुमेरसिंग
बोले मुखें 'कठिण ये मजला प्रसंग !'।

वाड्यांत वाघ खवळे जणुं काळरूपी
कीं काय आज रजपूत गमे सुरापी ! ॥ ११
जशी गाय धांवे वनीं बापुडी ती
तिला वाटतें गर्जतां व्याघ्र भीती ।
अहा ! पेशवा तेंवि सर्वत्र धांवे
नहो सोडिले- थोर दैवप्रभावें ! ॥ १२ ॥
हे गारदी निजगृहीं शिरती समस्त
होऊन मत्तकरिच्या सम खास मस्त।
दादांस हें सकळ वृत्त कळोनि आलें
अत्यन्त दंग मग चित्त तदीय झालें ॥ १३॥
अहा ! तरुण पेशवा करुण तो स्वरानें पळे
पराक्रमपटु स्वयें तदपि धैर्य सारें गळे ।
अहो मजसि वांचवा, मरणसागरीं मी बुडें
पित्या मरतसे तुझें अहह! लेंकरूं बापुडें ॥ १४ ॥
पळे त्वरित याक्षणीं मजसि तारगा बांधवा !
तुझा अनुज संकटीं स्मरुनि ये सख्या माधवा !
अहा ! स्वगृहिं वाढला भुजग दुग्ध जो सेवुनी
पहा निज विषानलें करुनि दग्ध टाकी धनी ॥१५॥
काका ! धांवा ! वांचवा ! सर्व धांवा!
येवो तुम्हां ! सत्वरें कींव, धांवा !
काका ! टाका आज पूजाच, धांवा !
या दुष्टांनीं बाळ कां हा वधावा ! ॥ १६ ॥
अनेकविध ओरडे, बिलगला तदा शेवटीं
गळ्यांत पडला भयें दृढ अतीव मारी मिठी ।

अहा, नच निघे मुखामधुनि शब्द ऐशी गती,
सुशुष्क रसना घडे मुकुनि ओष्ठ जाई किती ! ॥१७
उडे धडधडां तसें हृदय, शान्त जें सर्वदा
नितान्त खवळे मन, प्रचुरदान्त जें हो सदा ।
प्रताम्र नयनांतुनी गळति अश्रु ते टपटपां !
असा अळवि तेधवां 'मजवरी कराहो कृपा ॥ १८॥

काका तुह्मी याक्षणीं बापमाय
झाला माझ्या हातुनी दोष काय ! ।
काकू झाल्या रुष्ट बाळावरी या
आतां काका ! दाखवा सर्व माया ॥ १९ ॥

मजसि आश्रय या कटिचा असे
तदवलंबन सोडिन मी कसें ।
अवकृपा घडतां तुमची अशी
इतर रक्षिल कोण जगीं मशीं ! ॥ २० ॥

नितान्त करुणस्वरें दृढधरोनियां आळवी
स्वतात समजोनियां, तनु तदीय कीं पोळवी ।
म्हणे भिउं नको, नसे तुजसि भीति नारायणा !
वळें भिववुनी अरे उगिच घेशि कां आपणां ? ॥२१

प्रत्यक्ष काळ तंव घेउनि काय सोंग
येई करीं धरुनि खड्ग सुमेरसिंग !
धांवे सरोष बहु मागुति पेशव्याच्या
तो शेवटीं थडकला जवळी धन्याच्या । २२

जैसा बुभुक्षित मृगाधिप फार वेगें
सोडोनियां निजदरी गजपृष्ठि लागे ।

होई तदा स्थिति जशि करि शावकाची
झाली तशी अहह पुण्यपुरीश याची !॥ २३ ॥

राहे तेव्हां तो उभा सिंग रागें
कांपे ज्याचा हस्त खड्गप्रसंगें ।
मुद्रा त्याची म्लान अत्यन्त भासे
दुष्कृत्यानें कोण लोकीं विकासे ? ॥२४

'काका! काका! वांचवा संकटीं या
आला आला प्राण माझा हराया! ।
कांहो काका आज कां क्रुद्ध झालां
त्राता नाहीं काय या बाळकाला ! २५ ॥

घडे कोणता दोष ऐसा महान
करा हो क्षमा, द्या मला जीवदान ।
मला आसरा सर्वथा या करांचा
धनी कोण हो अन्य या चाकराचा ? ॥ २६ ॥

"स्वकरिं धरुनी या बाळाला स्वयें परिरक्षिलें
बहुत मजला काका तुम्ही ममत्वहि दाविलें ।
जनकजननी नाहीं ठावी समस्त तुम्ही मला
मजवरि असे एकाएकीं कशास्तव कोपलां? ॥ २७ ॥

"लहानपणचे किती स्मरति लाड सारे मला
असे अवडतां बहू, बहुत लाडका एकला! ।
तुम्ही स्वसुत मानुनी सदय पोशिला बाळ हा
महान सहसा कशी अवकृपा घडे आज, हा!! ॥२८॥

बाल्यापासुनि पोशिला शिशु
तुम्ही प्रेमें सदा पोरका,

काका! भेद कधीं मनीं न धरिला
होई असें आज कां ?।
पूर्वीपासुनि जो अतीव
तुमच्या स्नेहें असे वाढला
त्याचा नाश सुमेरसिंग
करण्यासाठीं अहो पातला !!! ॥ २९ ॥

ज्या वृक्षाला इतर जरि है
या जगीं जन्म माळी,
ईशाज्ञेनें तदपि सहसा
सोडि ज्याला अकाळीं।
त्यातें तुम्ही मग म्हणवुनी
आपुलासा दयेनें
केला मोठा सदयहृदयें
सत्कृपासिंचनानें ! ॥ ३०

"कधीं दुखविलें नसे, कधि न शब्दही बोललां
अनेकविध आदरें प्रियपदार्थ द्यावे मला।
रणें किमपि ज्या तुम्ही मज न या गृहीं ठेविलें
अशा शिशुसि आज कां सहज दूर हा लोटिलें? ३१

"मरणसमयिंचे ते शब्द त्या माधवाचे
स्मराति न मनिं काका! काय तुम्हांस साचे?।
सुजन निजमुखानें बोलती एकदां ते
अननृत करिती हो होउनी जीवदाते!" ॥ ३२॥

राघोबाच्या लागुनी फार कंठीं
जीवासाठीं आळवी; काळ कंठी!।

तों त्वेषानें सिंग बोले सुमेर
होई तेव्हां सर्वथा जो अधीर ॥ ३३ ॥

"दादासाहेब! सोडा त्वरितचि
ममता, तेंवि दुष्कीर्ति जोडा
तोडा स्वस्नेहबंधा,
मृदुलविषतरू-अंकुरामाजि खोडा ।
फोडा हा घाट, मोडा ध्वज निजारिपुचा,
नाहिं हा गोड ओढा
गाढा हा यत्न काढा,
स्वकरिं अखिलही थोर संपत्ति ओढा ॥ ३४॥

सोडा सोडा खास नारायणाला
सोडा सोडा तेंवि हो आपणाला ।
तोडा-तोडा कंठिंचा पाश तोडा
नाहीं गोडा हा गळ्यामाजि खोडा! ॥ ३५॥

दिसे कंप-ओष्ठीं, घडे क्रूर चर्या!
म्हणे "सर्व हें व्यर्थ आहे अनार्या!"
वदे मर्मवाक्यें, जणों बाण सोडी
धन्याची तदा धैर्यनौकाच फोडी! ॥ ३६ ॥

दया क्रूरतेमाजि कीं होय मग्न
चकाके अहा! तत्करीं खड्ग नग्न ।
गमे काय नागीण फोंफावते ही
निजस्वामिला जी डसायास पाही ॥ ३७ ॥

एका हस्तें पेशव्यातें धरून
'जा, जा, मूर्खा! येथुनी जा निघून" ।

राघोबा ते बोलती क्रोधवेगें;
कांपूं ज्याचें अंग सर्वस्व लागे ॥ ३८ ॥
"कापांत जा सत्वर दुष्ट सिंगा
उन्मत्त तूं येथ करीं न दंगा ! ।
समृशेर घेवोनि अरे हरामी
प्रवृत्त होशी अति दुष्ट कार्मी ॥ ३९ ॥
खाशी ज्याचें अन्न मूर्खा मुखानें
त्याच्या कंठीं खड्ग देशी करानें ! ।
स्वस्वामीचा प्राण घेण्यांत शूर
रे चांडाळा हो तुला केंवि धीर ॥ ४० ॥
"करुनि सेवन या गृहिं भाकरी
करिशि आज बहूदिन चाकरी ! ।
कुल जरी रजपूत तुझें असे
त्वरित सोडुनि हें स्थळ जा कसें! ॥ ४१ ॥
म्हणे हालवोनी तदा सिंग मान
"महाराज ! आहां तुम्ही बेइमान! ।
प्रतापें घडे सर्व हें आपल्या हो
अम्ही दास हम्मेश बंदेच आहों! ॥ ४२ ॥
जो हुकूम हुजुरांतुन येतो
मान्य संतत अम्हांप्रति होतो ।
चाकरास धनि चाकरि सांगे
त्यास तीच करणें मग लागे ॥ ४३ ॥
"मुखें सुष्ट वा दुष्ट वाणी वदावी
प्रतिज्ञा खरी सर्वथा ती करावी ।

घडे जी प्रतिज्ञा करीं पूर्ण ती मी
हरामी नसें जेंवि बम्मन् हरामी ! ॥ ४४ ॥

आर्या.

फेकुनि पत्र पुढें तें
सिंग म्हणे "लेख कोण दुष्टाचा ।
'मारावा' स्पष्ट असें
लिहिलें तो हात काय दादांचा ? ॥ ४५ ॥
भुलुनी त्या बाईला
म्हणतां आम्हां हराम या वेळीं ।
केळीं खाउनि होतां
राज्याचा करुनि राखरांगोळी ! ॥ ४६ ॥
स्त्रैणत्वें पत्र दिलें
तत्क्षणिं कर हे न खाक कां झाले ! ।
रे रे ! दुष्ट कर्मा !
अनुचित नसतें कपाळिं या आलें ॥ ४७ ॥
नेणुनि दुष्ट मनोरथ
त्या बाईच्या मनांतला सारा ।
उचलुनि हर ! हर ! कैसा
घे मी दुर्भाग्य बेलभंडारा ॥ ४८ ॥
नारायणास सोडा
काळाची कां करा वृथा हानी ! ।
दादा होइल अमुच्या
हातुनि तुमचाच घात या स्थानीं" ॥ ४९ ॥
तों इतुक्यांत गवाक्षांतुन
ती पापीण ओरडे कृत्या ।

दुष्टा सुमेरसिंगा !
अटपुनि घेशी त्वरें न कां कृत्या ? ॥ ५० ॥
ज्या हस्तांनीं लिहिलीं
गोड अशीं अक्षरें क्षणामाजीं ।
वळवायास्तव केले
अबलेनें यत्न थोर या काजीं ? ॥ ५१ ॥
जे हस्त या प्रसंगीं
उलटुनि निर्लज्ज दुष्ट कवळीती ।
या मेल्या पोरातें,
काटुनि ते टांक कां वृथा भीती ! ॥ ५२ ॥
हें टाकितें पुसोनी
कुंकू मी भाळिंचें दुजें काय ? ।
या सौभाग्यापेक्षां
वैधव्यानें सुशोभ हा काय !!! " ५३ ॥
काढोनि घोर वचनें स्वमुखेंच अंतीं
काळें करी मग विलक्षण राक्षसी ती ! ।
सोडोनि तों अहह शेवटिं सर्व कींव
जाई हळूच निघुनी रघुनाथराव ! ॥ ५४ ॥

दिंडया.

अहा जैसा तो मेंढपाळ जातां ।
नसे रानीं कोंकरालागिं त्राता ।
तदा कोल्हे लांडगे रूावळे ते ।
जाति धांवोनी त्यास खावयातें ! ॥ ५५ ॥
अहा! आश्रय जाउनी पेशव्याचा
पडे व्याघ्रांच्या मुखीं काय साचा ।

गारदी ते सत्वरें "दीन दीन" ।
करुनि धरिती तें बाळ तातहीन !! ॥ ५६ ॥

आर्या.

अत्यन्त लीन होउनि
रडुनी गद्गद, सुमेरसिंगास ।
मारी मिठी, वदे मग
"मारुं नका या अनाथ बाळास ! " ॥ ५७ ॥
"बाबा सुमेरसिंगा,
माता मजला पिताहि तैसारे ।
तूंच सख्या या समयीं
गमशी भुवनांत बा मला सारें ! ॥५८॥
मातेनें जन्म दिला,
परि रक्षिल जो पिता वदति त्यातें ।
त्यागुनि दुष्कृत्यातें,
करिं सिंगा आज धर्मकृत्यातें ! ॥ ५९ ॥
"नसे प्राणदानापरी दान अन्य
असे दानदाते जगीं होति धन्य ।
न कां बांधिशी गांठिं हें थोर पुण्य
तुला लाभती वित्तराशी अगण्य ! ॥ ६० ॥

आर्या.

"देईन सर्व कांहीं
परि या वेळीं दया तुला येवो ! ।
रक्ष सख्या ! तार मला,
हृदय तुझें अल्प आर्द्रता पावो ! ॥ ६१ ॥

मोठा पराक्रमी तूं,
मी दुर्बल दीन पोरका बाल ।
खड्ग रणोचित दूषित
करिशी मारूनि आज कंगाल ॥ ६२ ॥
"न मित्र मजला तुझ्याविण अशा प्रसंगीं असे
स्वरक्षण करावया स्वकरिं शस्त्रही या नसे ! ।
न दे मरण, येइ जो शरण, शूर त्यातें खरा
तया पुरुष बोलती, करिं विचार सिंगा बरा ॥ ६३ ॥

पद ( राग काफी. )

तारक पालक जीवनदायक
कोण दुजा वद सिंगा ।
दुर्भर दुर्धर नेम तुझा तो
घालवि सत्वर भंगा ॥ ध्रु० ॥
आजवरी मज सांभाळुनियां,
निष्ठुर हृदय घडावें ।
कां तरी सांग सख्या तव आतां-
बाळक हें रक्षावें ! ॥ १ ॥
॥ तारक पालक० ॥
बाळपणापासुनि जो तरु तूं
प्रेमसुसिंचित केला ।
कां सहसा तो काढुनि टाकिशि,
ऐक सख्या हा केला ॥ २ ॥
॥ तारक पालक० ॥

अपराधाविण सूड कशास्तव
घेशी, विवेक मनीं ।
क्षणभर कर तरि, जाय मरोनी
फुकट तुझारे धनी ! ॥ ३ ॥
॥ तारक पालक० ॥ ६४ ॥

साक्या.

श्रवण करुनि हें व्याकुळ झाला,
जीव पुन्हा सिंगाचा ।
दर दर सुटला द्रव हृदयाला,
दाह घडे अंगाचा ॥ ६५ ॥
नेत्रांमधुनी टपटप गळती लोट जणों अश्रूंचे ।
लटपट होउनि शस्त्र गळालें धरणीवर हातींचें ॥ ६६ ॥
यजमानाला कळवुनि दृढतर
तो गद्गद कंठानें ।
म्हणे "अहाहा ! समय आणिला
काय नीलकंठानें ॥ ६७ ॥
धरुनि हनुवटी निजपतिची मग
दर्शन घेइ मुखाचें ।
"अहह! दुष्ट मी छेदन करुं या
सुंदर नवचंद्राचें ? ॥ ६८ ॥
" नारायण तूं बाळक माझें !
काय करूं भगवंता! ।
मी जन्मांतरिं पातक केलें
काय महान अनंता ॥ ६९ ॥

"काटुनि टाका मजला कोणी
घेउनि ही समशेर।
हर! हर! पातक करूं तरी मी
केंवि विभो हें थोर! ॥ ७० ॥

आर्या.

या परि काळिज त्याचें
खायाला लागलें तयाला हो।
बोले "गर्दन माझी
काटा कोणी तरी असे याहो!" ॥ ७१ ॥
सत्याचें पालन ही
रजपुत यांची करी सदा जाती।
वचनाला गुंतुनि परि
अहह! जगीं हे कसे फसुनि जाती ॥ ७२ ॥
मित्रा! सुमेरसिंगा
व्यर्थ सख्या घेशि बेलभंडारा।
कोठुनि बुद्धि तुला हो!
निजपतिच्या बुडविण्यास संसारा! ॥ ७३ ॥
असो यापरी गोंधळे फार सिंग
तयाची घडे फार ती बुद्धि गुंग।
करावें कसें काय कांहीं कळेना
जिवाचा धनीही तया मारवेना ॥ ७४ ॥
पुन्हा खड्ग घेई, पुन्हा दूर फेंकी,
पुन्हा भूवरी अंग सक्रोध टांकी।

मिठी घालुनी घट्ट नारायणास
करी शोक; दे शाप तो आपणास ॥ ७५ ॥
ह्मणे "ही जळो जीभ, जाई न जीव
"जळो चाकरी ब्राह्मणाची वृथैव ! ।
कसा बाइनें घोळ हो घातला हा
कसाबापरी कृत्य सांगे अहाहा!! ॥ ७६ ॥
"मारावा" हे शब्द केले करानें
ऐसें केलें काय या लेंकरानें ।
दादा! बुद्धी मंद झाली कशी ही
कैसा लेखीं हात तो दुष्ट वाही!! ॥ ७७ ॥

आर्या.

"बेअक्कल होउनियां
स्त्रैणत्वं घोर लेख हा लिहिला ।
चांडाळिण परि झाला
लुब्ध कसे मीन पारध्यास हिला ? ॥ ७८ ॥
ऐसें सुमेरसिंग स्वमुखें दुःशब्द योग्य काढी तो ।
ती कृत्या क्रोधानें येउनि बोले विलंब कां होतो ? ७९
"मेल्या सुमेरसिंगा !
जात हरामी खरी तुझी सारी ।
काढुनि कंटक सत्वर
मजसि सुखी कां न करिशी संसारीं ! ॥ ८० ॥
तों सिंग सक्रोध असें ह्मणाला
"गे पापिणी कृष्ण करीं मुखाला ।

हें सत्य दुष्कृत्य घडे न मातें
येथोनि जा सत्वर दुष्टमाते !!" ॥ ८१ ।

आर्या.

आणंदीबाई हें परिसुनि करि फार लाल नेत्रांतें ।
बोले "मेल्या! दुसरा खास पती पाहिलास मातेतें ८२

वचनास गुंतशी तूं
आतां ऐसा कसा अरे सुटशी ।
विश्वासघात करिशी
बहुत तरी बाप होत रे तुजशी!" ॥ ८३ ॥
शब्द तिच्या तोंडांतुनि
ऐसे अश्लाघ्य सिंग ऐकुनि तो ।
खवळे व्याघ्र जसा कीं,
अंगाचा दाह होउनी जातो ॥ ८४ ॥
उठे क्रोधवेगें, करी रक्त डोळे
कुशब्दें गमे अंग सर्वस्व पोळे ।
वदे गारद्यांतें "असे दुष्ट दीन
ह्मणा पाहतां काय हो दीन दीन ! ॥ ८५ ॥
बुडो पेशवाई, बुडो राज्य सर्व
अहो ! लोटलें आज हें दुष्ट पर्व ।
असे शंकरेच्छा घडे खास तैसें
उठा गारदीहो! वनीं व्याघ्र जैसे !" ॥ ८६ ॥
नारायण तों फोडी
ऐकुनि हे घोर शब्द किंकाळी ।

"रे चांपाजी! येरे!
धांवा मरतों पळाच या काळीं" ॥ ८७ ॥
तों चांपाजी धांवे
स्वामीला मारि घट्ट घट्ट मिठी ।
हर! हर! तोहि धन्याच्या
ठेवी मग जीव आपुला कंठीं ॥ ८८ ॥
पुनरापि तो नारायण
आश्रय जाऊनि एकला धांवे ।
तों गाय आड आली
कीं पतिचें काज अन्ति साधावें ॥ ८९ ॥
"बहुत दिन तुझें मी दुग्ध सेवून केली
निजतनु अति पुष्टा, या जगीं केलि केली ।
म्हणुनि खचित आई माझि तूं या प्रसंगीं
निजसुत परि आतां तार गे तार अंगीं" ॥ ९० ॥
असें म्हणुनि काय तो बिलगला तिला पेशवा
वदे "अहह! तार गा मजसि तार गा केशवा" ।
परी अखिल शेवटीं विविध यत्न होती वृथा
पडे श्रमुनि भूवरी मग निराश हो सर्वथा ॥ ९१ ॥
ती धेनु ते मारिति दुष्ट लोक
ज्यांतें नसे अल्प तदा विवेक ।
कल्होळ झाला मग तो प्रचण्ड
ते गारदी मांडिति थोर बंड ॥ ९२ ॥
धनी जो राजाचा, जन डुलतसे, लक्ष पदरीं
परी यत्प्राणांतें लघुतम असा सेवक हरी! ।

शरीराचे होती पडुनि तुकडे विस्तृत कसे
विचित्र प्रारब्धा! तवहि महिमा भूतलिं असे ॥९३॥
गळून पडला जणों मुकुटिचा मणी भूवरी,
पळून अथवा गमे खचित जाय लक्ष्मी घरीं! ।
जगांत अति वाढला प्रबळ पातक्यांचा गण
म्हणोनि जणुं मावळे अहह! 'सूर्यनारायण'! ॥९४॥
विश्वामित्र जसा पुरातन हरिश्चंद्रास तो भोंवला,
भोंवे कैकयि मत्सरी कुटिल ती या रामचंद्रा तुला! ।
किंवा पंडुसुतांस दुर्धर जशी दुर्योधनाची मती
हाहा! आज सुमेरसिंग! तुजला आणंदि दे दुर्गती!९५
भेटे पानपतांत मृत्यु सहसा विश्वासरावा तुला !
थेऊरीं तुज माधवा रणपटो चाण्डाळ तो भेटला ।
राज्यामाजिं सुखांत सर्व असतां नारायणालागिंही
रत्नें यापरि तीन हीं कशि अहा! नेलीं तयानें गृहीं९६

वाटे त्यांत परंतु वाइट असें
कीं शूर होतासरे!
दुर्दैवें अमुच्या जरी न तव तें
आयुष्य थोडें सरे ।
तूं, मोठे करुनी प्रताप, अवघ्या
विस्तीर्ण राज्यास या
विप्राधीनच टाकितास करुनी
हें दुःख हो कासया! ॥ ९७ ॥
जातां नारायणा तूं अशुभ
शिरकलें सौख्य सारें उडालें,

विप्राची पायमल्ली अनुदिन
घडली, म्लेच्छ सर्वत्र झाले ।
म्लेच्छांसंगें उठावें, वचन
निजमुखें म्लेच्छ वाणींत व्हावें,
आला हा काळ आतां हर! हर!
उलटा, काय आम्हीं करावें? ॥ ९८ ॥
मित्रा! तूं सुटशी बरा लवकरी
आणंदिच्या हातुनी!
तैसें घातक मोहजाळ अवघें
हें टाकिशी तोडुनी ।
मायेचा भुवनीं सख्या! पसरला
हा खेळसा वाटतो
देवो सौख्य तुला सदा निजपदीं
बा सच्चिदानंद तो! ॥ ९९ ॥

समाप्त.

## जाहिरात.

खालील पुस्तकें इंदुप्रकाश छापन्यांत अगर खाली सही करणारांकडे विक्रीस आहेत. किं.खेरीज वं.खर्च ८=॥.

| पुस्तकाचें नांव. | रु. | आ. |
|---|---|---|
| १ मल्हारराव महाराज गायकवाडाचें नाटक. | १ | |
| २ अजविलाप (रघूच्या आठव्या सर्गाचें पद्यात्मक भाषांतर .............. | | ४ |
| 3 Akbar & Suez Canal (two short English poems in one book) ............ | 0 | 2 |
| 4 A Welcome Address to H. R. H. the Prince of Wales ................ | 0 | 4 |
| ५ हिमालय वर्णनम् (कै. रा. रा. विठ्ठल बापूजी करमरकर बी. ए. यांचें) .... | | ४ |
| ६ बुद्ध चरित्र .............. | | २ |
| (याशिवाय पुढील पुस्तकें छापत आहेत.–) | | |
| ७ कृष्णाकुमारी नाटक .............. | १ | |
| ८ मराठ्यांच्या वैभवाचा काळस व सोनपतपानतचे लढाईवर नाटक ........ | १ | |
| ९ अकबर बादशाहा (मे. द. प्रै. क. नें बक्षीस दिलेली कविता) .......... | | ८ |
| १० देवास अर्जी व पतिविरहश्लोक [Reprinted from the V. D. Vistar .......... | 0 | 4 |
| ११ चार नवलें (रा.ब. वासुदेव बापूजी कानिटकर यांनीं मराठी ज्ञा.प्र मं.करितां रचिलेलीं ) | १ | |

गोविंद वासुदेव कानिटकर,
गिरगाव ठ्याकरोड, घरनंबर ७.